नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८
संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ / ९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

## बिहारमध्ये गोभक्त निवडणूक लढवणार

■ **वृत्तसंस्था, मुझफ्फरपूर, दि. ७ :**
जगद्गुरू शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती महाराज यांनी बिहार विधानसभा निवडणुकीत सर्व जागांवर स्वतंत्र गोपूजक उमेदवार उभे करण्याचा आपला हेतू जाहीर केला आहे.

या घोषणेसह, त्यांनी सनातन धर्माचा प्रचार, गाय मातेचे रक्षण आणि समाजात सांस्कृतिक जागरूकता पसरवण्याच्या उद्देशाने बिहारमध्ये गो मतदार संकल्प यात्रा सुरू केली आहे. एका सभेला संबोधित करताना स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती म्हणाले की, सनातन धर्माचे रक्षण तेव्हाच शक्य आहे जेव्हा आपण गाय मातेचे रक्षण करू. गोरक्षण ही केवळ श्रद्धेची बाब नाही तर ती आपल्या संस्कृती आणि समाजाचा पाया आहे.

* वर्ष ५२ * अंक ९५ * * अकोला * बुधवार, दिनांक ८ ऑक्टोबर २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्राग्रलेख

## खरीखरी..

# आशेची किरणे

अखेर शेतकऱ्यांसाठी महाराष्ट्र सरकारने मूलभूत कामांकरिता मदत जाहीर केलेली आहे. यावर्षीच्या विनाशकारी पावसाने लाखो एकर जमीन अक्षरशा खरडून गेलेली आहे. हे संकट अभूतपूर्व आहे. आपत्तीग्रस्त परिस्थिती येणे, अतिवृष्टीमुळे पिकांचे नुकसान होणे अशा गोष्टी दर दोन-चार वर्षांनी होतच असतात पण, यावर्षीच्या पावसाने जे काही जबरदस्त नुकसान केलेले आहे. त्यामुळे भविष्यात खरडून गेलेल्या जमिनीवर पुढील काही वर्षे पीक घेणे ही शक्य होण्यासारखी परिस्थिती नाही. या प्रकारच्या अशा मोठ्या नुकसानीची भरपाई पूर्णपणे होऊ शकत नाही पण, तरीही राज्य सरकारने अशा जमिनीच्या दुरुस्तीसाठी ३१ ते ३२ हजार कोटीच्या दरम्यानचे पॅकेज जाहीर केलेले आहे. महाराष्ट्राच्या तिजोरीची सध्याची परिस्थिती काय आहे हे जगात जाहीर आहे. सरकारला शेतकऱ्यांची मागणी १००% मान्य करणे शक्य नाही कारण कुठलीही आपत्तीमध्ये झालेली नुकसानीची गोष्ट असो. त्या होणाऱ्या नुकसानीची संपूर्ण रक्कम कधीच कोणालाही मिळत नसते हे सत्य आपण समजून घेतले पाहिजे. त्या परिस्थितीतही आताच्या घडीला सरकारने जी मदत जाहीर केलेली आहे. ती निश्चितच उल्लेखनीय मानावी लागेल कारण कासावीस झालेल्या शेतकरी बांधवांना ऐन दिवाळीच्या पर्वावर दिवाळे निघण्याची वेळ आल्यासारखे झालेले आहे. लहान शेतकऱ्यांचे तर पार कंबरडेच मोडून गेलेले आहे. आता या सरकारी रकमेचा उपयोग त्याच कामासाठी होईल ज्यायोगे ती जमीन पुन्हा पेरणी योग्य होईल. याचाच दुसरा अर्थ असा की पिकाच्या नुकसानीची भरपाई या मदतीमध्ये समाविष्ट नाही, ती रक्कम कदाचित वेगळी असावी. सध्या शेतीचे दुहेरी नुकसान झालेले आहे त्यामुळे मदतही वेगवेगळ्या प्रकारे मिळालीच पाहिजे. अनेक शेतकऱ्यांनी विमा काढलेला आहे, गेले अनेक वर्ष विमा कंपन्या गडगंज नफा कमावीत आहेत. यावर्षी जल विस्फोटामुळे शेतकऱ्यांच्या नशिबी विस्फोटक स्थिती आणून उभी केलेली आहे. एवढे सर्व झाल्यावरही शेतमालाला पुरेसा कुठेच भाव नाही हे विशेष आहे. ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झालेले आहे त्यांची हतबलता बघून ज्यांचे डोळे पाणावत नाहीत असा माणूस शोधूनही सापडणार नाही. त्यातल्या त्यात या आपत्तीमध्येही जे थोडेफार तथाकथित सुखी असतील, ते सोडल्यास बाकीचे आपद्ग्रस्त निदान सरकारने आपली अडचण जाणून मदत दिली, हे ऐकून त्यांनाही बरे वाटत असेल. आता ज्या ज्या भागांमध्ये पावसाचा उद्रेक झाला आहे त्या ठिकाणच्या पिकांची परिस्थिती आणि पिकांना मिळणारे उत्पन्न यांचा कुठेही ताळमेळ बसत नाही. म्हणजेच बऱ्यापैकी पीकही नाही आणि त्याहून जास्त मोठे दुःख म्हणजे शेतकऱ्यांच्या पिकाला भावही नाही. अशा गोंधळलेल्या परिस्थितीमध्ये सरकारने ज्या पद्धतीने मदतीची घोषणा केलेली आहे त्याबद्दल सरकारचे अभिनंदन केलेच पाहिजे. सरकारच्या या मदतीमुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळेल, त्यांच्या जगण्याला निश्चितच दिशा मिळेल. ही फक्त आशेची किरणे आहेत असे आम्हाला वाटते. भविष्यात सरकारकडून आणखीही मदत मिळण्यासाठी वेगवेगळ्या संस्था, संघटना मदत जाहीर करीत आहेत. त्याचाही फायदा मिळावा ही महाराष्ट्राच्या बिगर शेतकरी जनतेची अपेक्षा आहे, यापेक्षा वेगळे काय सांगावे. शेतकऱ्यांच्या टाहोला योग्य ठरवून घेतलेला निर्णय लवकरात लवकर प्रत्यक्षात उतरावा, एवढीच आमची मनापासूनची अपेक्षा आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

## शेतकऱ्यांसाठी ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर

# सरकारने तिजोरी उघडली

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :**
राज्य सरकारच्या मदती कडे आस लावून बसलेल्या पूरग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देत राज्य सरकारच्या वतीने अखेर पॅकेज जाहीर करण्यात आले आहे. ३१ हजार ६२८ कोटी रुपयांचे मोठे पॅकेज आपण शेतकऱ्यांच्या मदतीसाठी देत असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषदेत दिली.

हा जास्तीत जास्त पैसा दिवाळीच्या आधी, शेतकऱ्यांना देता येईल, असा राज्य सरकारचा प्रयत्न असल्याचेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. मंत्रिमंडळ बैठकीनंतर मुख्यमंत्र्यांसह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पत्रपरिषदेत ही घोषणा केली.

या पॅकेजअंतर्गत शेतकऱ्यांना केवळ जमिनीच्या नुकसानीसाठीच नव्हे, तर घरांचे व जनावरांचे नुकसान भरपाई म्हणूनही मदत मिळणार आहे. शेतकऱ्यांच्या शेती पिकांचे नुकसान, वाहून गेलेली जमीन, कोसळलेली घरे आणि मृत जनावरे यासाठी स्वतंत्र अनुदानाचा आराखडा तयार करण्यात आला आहे.

ग्रामपंचायत आणि महसूल यंत्रणेकडून पंचनामे पूर्ण होताच संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यात थेट आर्थिक मदत जमा केली जाणार आहे. या निर्णयामुळे अनेक शेतकऱ्यांना पुन्हा शेती उभी करण्यास मदत होईल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

फडणवीस यांनी स्पष्ट केले की, राज्य सरकारकडून केवळ आर्थिक मदतच नव्हे, तर पीक पुनर्लागवड, बी-बियाणे वितरण, सवलतीचे कर्ज आणि कृषी यंत्रसामग्री पुरवठा अशा सर्व बाबींसाठी विशेष योजना सुरू करण्यात येतील. पंचनामे लवकर पूर्ण करून शेतकऱ्यांच्या खात्यात थेट मदतीची रक्कम जमा करण्यात येईल, असंही त्यांनी सांगितलं.



### २९ जिल्ह्यांतील शेतकऱ्यांना मिळणार मदत

फडणवीस म्हणाले की, राज्यातील १ कोटी ४३ लाख ५२ हजार हेक्टर जमिनीवर यंदा लागवड झाली होती. त्यापैकी ६८ लाख ७९ हजार ७५६ हेक्टर जमिनीवरील पिकांचे नुकसान झाले आहे. यामुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून, त्यांच्या पुनर्वसनासाठी राज्य सरकारने तत्काळ मदत कार्याला गती दिली आहे. त्यांनी सांगितले की, ज्या भागात नुकसान झाले आहे, तिथे २९ जिल्हे, २५३ तालुके आणि २०५९ महसूल मंडळांचा समावेश आहे. त्या सर्व भागात मदत पोहोचवण्याचे काम युद्धपातळीवर सुरु असल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

## २ सप्टेंबरच्या अध्यादेशाला स्थगिती नाहीच!

**उच्च न्यायालयाचा स्पष्ट नकार**

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ७ :**
राज्य सरकारने २ सप्टेंबर २०२५ रोजी ओबीसी प्रवर्गात मराठा समाजासाठी आरक्षणाचा अध्यादेश जाहीर केला होता. या निर्णयाविरुद्ध काही व्यक्तींनी उच्च न्यायालयात अनेक याचिका दाखल केल्या होत्या. याचिकांकर्त्यांनी अध्यादेशावर तात्काळ स्थगिती देण्याची मागणी केली असली तरी न्यायालयाने त्याला स्पष्ट नकार दिला. त्यामुळे राज्य सरकार आणि मराठा समाजासाठी हा मोठा दिलासा मानला जात आहे.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वाखाली मुंबईत झालेल्या आंदोलनानंतर राज्य सरकारने हैदराबाद गॅझेटियर लागू करण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयानुसार, हैदराबाद गॅझेटियरच्या नोंदीच्या आधारे कुणबी मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण देण्यात आले. हा निर्णय जाहीर होताच ओबीसी संघटना आणि काही समाज घटकांनी याला तीव्र विरोध दर्शवला.

त्यांनी हा निर्णय असंवैधानिक असल्याचे सांगत थेट मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. मात्र, न्यायालयाने सरकारच्या या निर्णयावर तात्काळ स्थगिती देण्यास स्पष्ट नकार दिला आहे.

मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्या. चंद्रशेखर आणि न्या. गौतम अंखड यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणाची सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने २ सप्टेंबरच्या शासन निर्णयावर अंतरिम स्थगिती देण्याची मागणी फेटाळली. म्हणजेच राज्य सरकारने जारी केलेला हैदराबाद गॅझेटियर अंमलबजावणीचा आदेश अद्याप वैध आणि प्रभावी राहणार आहे. न्यायालयाने या याचिकांवर सविस्तर सुनावणीसाठी तारीख दिली असली तरी, तात्पुरती स्थगिती नाकारल्याने सरकारचा निर्णय यथावत राहिला आहे.

राज्यातील विविध ओबीसी संघटना, जसे की कुणबी सेना, महाराष्ट्र माळी समाज महासंघ, अहिर सुवर्णकार समाज संस्था, महाराष्ट्र नाभिक महामंडळ, तसेच सामाजिक कार्यकर्ते सदानंद मंडलिक यांनी शासनाच्या निर्णयाला विरोध करीत या याचिका दाखल केल्या होत्या. परंतु, त्या कोर्टाने फेटाळून लावल्या.

## तुकडा बंदी अधिनियमात सुधारणा

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ७ :**
राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले असून, त्यापैकी दोन प्रमुख निर्णय हे तुकडा बंदी अधिनियम सुधारणा आणि झोपडपट्टी पुनर्वसनामध्ये क्लस्टर योजना लागू करण्यासंदर्भात आहेत.

तुकडा बंदी अधिनियमातील सुधारणेमुळे महाराष्ट्रातील छोट्या प्लॉट धारकांना मोठा दिलासा मिळणार आहे, तर दुसऱ्या निर्णयानुसार एसआरएमध्ये क्लस्टर योजना राबवण्यास मंजुरी मिळाली आहे.

**उद्योग विभाग : राज्याचे रत्ने व दागिने धोरण २०२५ जाहीर**

■ सोने, चांदीचे दागिने, हिरे-रत्ने यांच्याशी निगडीत उद्योग-व्यवसाय वाढीस चालना मिळणार. एक लाख कोटी रुपयांची गुंतवणूक, पाच लाख नवीन रोजगार निर्मितीचे उद्दीष्टे.

**नगर विकास विभाग : सांडपाण्यावर प्रक्रियेचे धोरण**

■ सांडपाण्यावरील प्रक्रियेमुळे आणि त्याच्या पुनर्वापराद्वारे चक्रीय अर्थव्यवस्थेस चालना. सांडपाण्याचे शाश्वत व्यवस्थापन, पर्यावरण रक्षण, आरोग्यदायी परिसर या संकल्पनेला बळ मिळणार. ४२४ नागरी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये धोरण राबवण्यात येणार.

■ अमरावती महापालिकेला केंद्र शासन पुरस्कृत पी.एम.ई बस योजनेअंतर्गत ई-बस डेपो व चार्जिंग व्यवस्थेकरिता मौजा बडनेरा येथील २.३८ हे.आर जमीन ३० वर्षासाठी उपलब्ध करून देण्याचा निर्णय.

■ स्वयंसेवी संस्थांद्वारे चालवण्यात येणाऱ्या विजाभज प्रवर्गाच्या खाजगी अनुदानित प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक निवासी आश्रमशाळा, ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींसाठीच्या निवासी आश्रमशाळा तसेच विद्यानिकेतन आश्रमशाळांतील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना २ लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागू करण्याचा निर्णय. अशा ९८० आश्रमशाळातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लाभ मिळणार.

## सरकारच्या मदत पॅकेजवर विरोधकांची टीका

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :**
महायुती सरकारने अतिवृष्टीबाधित शेतकऱ्यांसाठी जाहीर केलेल्या मदत पॅकेजवर विरोधी पक्षांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. ही मदत तुटपुंजी असून, सरकारने शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळल्याची संतप्त टीका करत कर्जमाफीच्या आश्वासनालाही पद्धतशीर बगल दिल्याचा आरोप रोहित पवारांनी केला.

तर हेक्टरी ५० हजार रुपयांची मागणी असताना, केवळ तुटपुंजी मदत जाहीर करून, फसणवीस सरकारने शेतकऱ्यांची फसवणूक केल्याचे काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले.

संपूर्ण कर्जमाफीच्या मागणीला या सरकारने पद्धतशीरपणे बगल दिलीच, पण तोंडाला अक्षरशः पाने पुसली, असे आ. रोहित पवार म्हणाले. महाराष्ट्रात शेतकऱ्यांच्या हिताचा निर्णय घेताना सरकारच्या हाताला कंप का येतो? असा सवाल सपकाळ यांनी केला.

दुसरीकडे, महायुती सरकार हे शेतकऱ्यांची थट्टा करत आहे, अशी टीका विजय वडेट्टीवार यांनी केली. कर्जमाफी करणार करणार फक्त तारीख पे तारीख सरकार सांगत आहे. पण नेमकी कर्जमाफी कधी देणार हे सरकार सांगत नाही, असेही ते म्हणाले.

# २४,६३४ कोटींच्या ४ नवीन रेल्वे प्रकल्पांना मंजुरी

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ७ :**
पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक झाली आणि एकूण २४,६३४ कोटींच्या प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, बैठकीत चार नवीन रेल्वे प्रकल्पांना मान्यता देण्यात आली.



यामध्ये मध्य प्रदेशातील इटारसी-भोपाळ-बीना मार्गावरील २३७ किमी लांबीचा चौथा मार्ग आणि गुजरात आणि मध्य प्रदेशला जोडणारा वडोदरा-रतलाम मार्गावरील २५९ किमी लांबीचा तिसरा आणि चौथा मार्ग समाविष्ट आहे.

या प्रकल्पांमध्ये महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गुजरात आणि छत्तीसगडमधील १८ जिल्ह्यांचा समावेश असेल. भारतातील सात रेल्वे कॉरिडॉर एकूण रेल्वे वाहतुकीपैकी ४१% वाहतूक करतात आणि हे प्रकल्प या कॉरिडॉरची क्षमता आणि कनेक्टिव्हिटी मजबूत करतील.

वैष्णव म्हणाले की, या प्रकल्पांमुळे केवळ रेल्वेची क्षमता वाढणार नाही तर गर्दी कमी होईल, वेळ वाचेल आणि रेल्वे सेवांची विश्वासार्हता सुधारेल. ते म्हणाले, आम्ही ठरवले आहे की या कॉरिडॉरमध्ये किमान चार आणि शक्य असल्यास सहा मार्ग असतील.

गोंदिया ते डोंगरगड : चौथी लाईन, ८४ किमी (महाराष्ट्र आणि छत्तीसगड)
वर्धा ते भुसावळ : तिसरी आणि चौथी लाईन, ३१४ किमी (महाराष्ट्र)
वडोदरा ते रतलाम : तिसरी आणि चौथी लाईन लाईन, २५९ किमी (गुजरात आणि मध्य प्रदेश)
इटारसी ते भोपाळ ते बिना : चौथी लाईन, २३७ किमी (मध्य प्रदेश) आदिंचा या प्रकल्पात समावेश आहे.

## युपीआय पेमेंटसाठी वापरले जाईल चेहरा आणि फिंगरप्रिंट

**नवीन फीचर्सला सरकारची मान्यता**

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ७ :**
युपीआय वापरकर्ते आता त्यांच्या चेहऱ्याचा आणि फिंगरप्रिंटचा वापर करून पेमेंट करू शकतील. केंद्र सरकारने आज, ७ ऑक्टोबर रोजी युपीआय चालवणारी एजन्सी एनपीसीआयच्या नवीन बायोमेट्रिक फीचर्सना मान्यता दिली.
एनपीसीआय लवकरच त्यांच्या वापरकर्ता पुस्तिका आणि अंमलबजावणी तारखेची माहिती जाहीर करेल. त्यात म्हटले आहे की, ही नवीन पद्धत वढक पेमेंट सोपे, सुरक्षित आणि अधिक वापरकर्ता-अनुकूल बनवेल. नवीन फीचर्समुळे युपीआय पेमेंट पर्यायी करण्यासाठी पिनची आवश्यकता कमी होईल. एटीएममधून पैसे काढण्यासाठी आणि युपीआय पिन सेट करण्यासाठी देखील फिंगरप्रिंटचा वापर होणार आहे.

## आयएएस अधिकाऱ्याची आत्महत्या



■ **वृत्तसंस्था, चंदीगड, दि. ७ :**
हरियाणाचे वरिष्ठ आयपीएस अधिकारी वाय. पूरण कुमार यांनी आत्महत्या केली आहे. त्यांनी चंदीगडच्या सेक्टर ११ येथील त्यांच्या सरकारी निवासस्थानी स्वतःवर गोळी झाडून घेतली. पूरण कुमार हे एडीजीपी दर्जाचे अधिकारी होते. २९ सप्टेंबर रोजी त्यांना रोहतकच्या सुनारिया तुरुंगात हलवण्यात आले होते, जेथे डेरा सच्चा सौदा प्रमुख रामरहिम शिक्षा भोगत आहे.

## माणसाची नाही... संविधानाची हत्या

■ **वृत्तसंस्था, रायबरेली, दि. ७ :**
रायबरेलीतील मॉब लिंचिंगबाबत राहुल गांधी म्हणाले, दलित तरुण हरिओम वाल्मिकीची क्रूर हत्या ही केवळ एका माणसाची हत्या नाही, तर मानवतेची, संविधानाची आणि न्यायाची हत्या आहे. या देशात द्वेष, हिंसाचार आणि जमावाला सत्ताधारी पक्षाचे संरक्षण आहे.



राहुल गांधी म्हणाले की, संविधानाची जागा बुलडोझरने घेतली आहे आणि न्यायाची जागा भीतीने घेतली आहे. पण हा देश जमावाच्या इच्छेनुसार नाही, तर संविधानाने चालवला जाईल. भारताचे भविष्य समानता आणि मानवतेवर अवलंबून आहे. मी कुटुंबासोबत उभा आहे. त्यांना नक्कीच न्याय मिळेल. २ ऑक्टोबर रोजी हरिओम पासवानची हत्या करण्यात आली होती.

## २ राज्यांमध्ये कफ सिरपमुळे २३ मुलांचा मृत्यू

**५ राज्यांमध्ये सिरपवर बंदी**

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ७ :**
मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्ये विषारी कफ सिरप प्यायल्याने आतापर्यंत तेवीस मुलांचा मृत्यू झाला आहे. २ सप्टेंबरपासून मध्य प्रदेशात १९ आणि राजस्थानमध्ये चार मुलांचा मृत्यू झाला आहे. यानंतर, मध्य प्रदेश, राजस्थान, केरळ, तामिळनाडू आणि पंजाबने सिरपच्या विक्री आणि वापरावर बंदी घातली आहे.
या प्रकरणाची सीबीआय चौकशी करावी आणि देशभरातील औषधांच्या सुरक्षिततेची चौकशी करावी अशी मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आली आहे. वकील विशाल तिवारी यांनी याचिकेत अशी मागणी केली आहे की, न्यायालयाने सरकारला राष्ट्रीय न्यायिक आयोग किंवा तज्ञ समिती स्थापन करण्याचे निर्देश द्यावेत आणि तपास सर्वोच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांच्या देखरेखीखाली करावा.



दरम्यान, तामिळनाडू ड्रग्ज कंट्रोल डिपार्टमेंटने सिरप बनवणाऱ्या कंपनीला कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. कांचीपुरम येथील कंपनी श्रीसन फार्मास्युटिकल्सने कंपनीला नोटीस बजावली आहे. सरकारने पाच दिवसांत कंपनीकडून उत्तर मागितले आहे.

गुजरातमधील दोन कफ सिरप कंपन्यांच्या नमुन्यांमध्ये विषारी डायथिलीन ग्लायकोल आणि इथिलीन ग्लायकोल चे प्रमाण जास्त आढळले. छिंदवाडा येथून १९ औषधांचे नमुने घेण्यात आले. गुजरातमधील रिलाइफ सिरप आणि रेस्पिफ्रेश टीआर सिरपमध्ये अनियमितता आढळून आली आहे.




## राज्यात आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्या

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. ७ :**
राज्य शासनाने आज सात वरिष्ठ आयएएस अधिकाऱ्यांच्या बदलीचे आदेश जारी केलेत.
रत्नागिरीचे जिल्हाधिकारी एम. देवेंद्रसिंह यांची बदली करून त्यांची महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई येथे सदस्य सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखरसिंह यांना कुंभमेळा आयुक्त, नाशिक या महत्त्वाच्या पदावर नेमण्यात आले आहे.

नाशिकचे जिल्हाधिकारी जलज शर्मा यांची बदली नाशिक महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणाचे महानगर आयुक्त म्हणून करण्यात आली आहे. त्यांच्या जागी जळगावचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांची नाशिक जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. दरम्यान, ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांना जळगाव जिल्हाधिकारी म्हणून नेमण्यात आले आहे. संजय कोलटे यांची बदली साखर आयुक्त, पुणे या रिक्त पदावर करण्यात आली आहे.

# शिवसेना कुणाची? आज सुप्रीम कोर्टात अंतिम सुनावणी

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :**
महाराष्ट्राच्या राजकारणात चर्चेचा विषय असलेल्या 'खरी शिवसेना कुणाची?' या ऐतिहासिक प्रश्नावर आज ८ ऑक्टोबर रोजी सर्वोच्च न्यायालयात निर्णायक सुनावणी पार पडणार आहे.

गेली तीन वर्षे चालत असलेल्या या वादावर अखेर उद्या न्या. सूर्यकांत यांच्या खंडपीठासमोर अंतिम युक्तिवाद होणार असून, त्यानंतर न्यायालय आपला निकाल राखून ठेवेल किंवा तत्काळ जाहीर करेल हे पहावे लागणार आहे.
उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे या दोन गटांमध्ये शिवसेनेच्या नाव आणि पारंपरिक धनुष्यबाण चिन्हावरून सुरू असलेला वाद गेली तीन वर्षे सर्वोच्च न्यायालयात न्यायप्रविष्ट आहे.




शिवसेनेत २०२२ मध्ये मोठी बंडखोरी झाली होती. त्यानंतर फेब्रुवारी २०२३ मध्ये निवडणूक आयोगाने एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील गटाला शिवसेना हे नाव व धनुष्यबाण हे चिन्ह दिले होते. निवडणूक आयोगाच्या या आदेशांना उद्धव ठाकरे यांनी आव्हान दिले होते.

या प्रकरणात अनेक प्राथमिक सुनावण्या झाल्या असून, बुधवारी होणारी सुनावणी ही अंतिम टप्प्यातील निर्णायक कार्यवाही मानली जात आहे. न्यायालयात दोन्ही बाजूंकडून सविस्तर युक्तिवाद पूर्ण झाले असून, आज निकाल लागण्याची शक्यता आहे.

या सुनावणीच्या पार्श्वभूमीवर वकील असीम सरोदे यांनी मोदी आणि शिंदे यांच्यावर अप्रत्यक्ष टीका केली आहे. शिवसेना धनुष्यबाण चिन्हाबाबत उद्या अंतिम सुनावणी घेणार असे सर्वोच्च न्यायालयाने जाहीर केले आहे. ८ ऑक्टोबरला न्यायाधीश सूर्यकांत नक्की सुनावणी घेतील अशी अपेक्षा आहे. इकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी बांधून तयार नसलेल्या विमानतळाचे नवी मुंबईत दिखाऊ उद्घाटन करणार आणि त्याचवेळी एकनाथ शिंदे यांचे विमान सर्वोच्च न्यायालय जमिनीवर पाडणार का? असा खोचक टोला त्यांनी लगावला आहे.

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे उपकेंद्र अकोला येथे सुरू करण्यासाठी मंत्रालयात बैठक

■अकोला,दि ७ (प्रतिनिधी) :

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे उप केंद्र अकोला येथे सुरु करण्यासाठी घेतलेल्या मंत्रालयीन बैठकीत मा. ना. चंद्रकांत दादा पाटील, मंत्री उच्च व तंत्र शिक्षण यांचे विद्यापीठ प्रशासनाला निर्देश- आमदार रणधीर सावरकर यांनी उपकेंद्र तातडीने सुरु करण्याच्या निर्णयासाठी उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांना बैठक घेण्याची विनंती केली होती.



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे क्षेत्र व प्रशासनाचा व्याप लक्षात घेता या विद्यापीठाचे उपकेंद्र अकोला येथे सुरु करण्यासाठी आमदार रणधीर सावरकर मागील अनेक वर्षांपासून सतत प्रयत्नशील होते. या करिता त्यांनी सतत पत्रव्यवहार व सर्वे संसदीय मार्गाद्वारे आमदार सावरकर यांनी प्रयत्न केले असता राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ना. चंद्रकांत दादा पाटील यांनी अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू यांना सदरचा प्रस्ताव तातडीने शासनास सादर करावा अशा सूचना निर्गमित केली होत्या.

तथापि विद्यापीठाचा धीमा प्रतिसाद लक्षात घेता आमदार रणधीर सावरकर यांनी राज्याच्या अधिवेशनामध्ये या उपकेंद्राची मागणी सभागृहात केली असता राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री ना. चंद्रकांत दादा पाटील यांनी सदर उपकेंद्र अकोला येथे सुरु करण्याचे आश्वासन दिले होते.

सदर आश्वासनाची पूर्तता करण्यासाठी मा. मंत्री उच्च व तंत्र शिक्षण यांनी आमदार रणधीर सावरकर समवेत आज (७ ऑक्टोबर २०२५) रोजी मंत्रालयीन दालनात विद्यापीठासह सर्व संबंधित अधिकाऱ्यांचे सोबत बैठक आयोजित केली होती. बैठकीच्या सुरुवातीला आमदार रणधीर सावरकर यांनी स्पष्ट केले की अमरावती विद्यापीठाचे अंतर्गत अकोला, बुलढाणा व वाशिम या ३ जिल्ह्यां करिता अकोला येथे विद्यापीठाचे उपकेंद्र व्हावे. विद्यापीठा अंतर्गत असलेल्या ४४१ महाविद्यालयांपैकी २२१ (५०%) महाविद्यालये तसेच ४५% विद्यार्थी संख्या या ३ जिल्ह्यांमध्ये आहे. बुलढाणा जिल्ह्यातील देऊळगाव राजा तालुक्यातील महाविद्यालयाचे अमरावती पर्यंतचे अंतर २०० की.मी. पेक्षा ही अधिक आहे. ३ जिल्ह्यातील महाविद्यालयाची संख्या व ते अंतर लाक्षत घेता वेळखाऊ ठरत असल्याने महाविद्यालय, विद्यार्थी व पालक यांना प्रचंड गैरसोयीचे आहे.

या सर्वे बाबी लक्षात घेता मंत्री महोदयांनी उपस्थितांना अकोला येथे उपकेंद्र करिता जागा शोधण्याचे निर्देश दिले तसेच सदरचे उपकेंद्र तातडीने सुरु करण्या करिता एकाद्या महाविद्यालयाचा शोध घेण्यासाठी सांगितले.

# खासदार–आमदारांचा अपमान व्हायरल; भाजपाचा संताप उसळला!

■अकोला,दि ७ (प्रतिनिधी) :

अकोला लोकसभा मतदारसंघाचे खासदार अनुप भाऊ धोत्रे आणि मुर्तिजापूरचे आमदार हरीष पिंपळे यांचा अपमान करणारा आक्षेपार्ह व्हिडिओ आणि व्यंगचित्र सोशल मीडियावर झपाट्याने व्हायरल झाल्याने जिल्हा हादरला आहे. बार्शीटाकळी तालुक्यातील भेडगाव येथील महादेव गावंडे या व्यक्तीने 'शेतकऱ्यांनी माझ्याकडून काही अपेक्षा ठेवू नयेत' असा उपरोधिक मजकूर व गाण्यासह दोन्ही नेत्यांची विटंबना करणारा व्हिडिओ प्रसारित केला.



या व्हिडिओत राष्ट्रपिता महात्मा गांधींचा चेहराही वापरून त्यांच्या प्रतिमेचा अवमान केल्याने संतप्त भाजपा कार्यकर्त्यांचा संताप उसळला. 'नेत्यांचा अपमान सहन केला जाणार नाही!' असा घोष देत शेकडो कार्यकर्त्यांनी बोरगाव मंजू पोलिस ठाण्यात धडक देत आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची मागणी केली.या तक्रारीवर भाजपा तालुका ग्रामीण अध्यक्ष प्रवीण हगवणे, सरचिटणीस जयकृष्ण ठोकळ पाटील, सुबोध गवई, चंद्रकांत मांगे, मुरली चवरे आदींसह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. पोलिसांनी तक्रार नोंदवून तपास सुरू केला आहे.

# अकोला शहरातून सर्वात मोठी निघणाऱ्या काकडा आरती ला आरभ

**उठा उठा साधू संत साधा आपले हित! जाईल हा नरदेह मग तो केसा भगवतं!**



■अकोला,दि ७ (प्रतिनिधी) :

साला बादा प्रमाणे गेल्या २२ वर्षा पासून चालू असलेल्या अकोला जिल्यातील सर्वात मोठ्या काकडा आरती चा आरभ कोजागिरी साजरी करून आज दिनांक ७/१०/२५ मंगळवारी सकाळी ५ वाजता आरभ करण्यात आला हि काकडा आरती गोरोबा काका मंदिर,वानखडे नगर,गुरुदेव नगर महादेव व गजानन महाराज मंदिर,गुरुदेव नगर बजरंग बल्ली मंदिर,रुध्द हनुमान मंदिर,फळके नगर,गजानन नगर रेणुका नगर इत्यादी ठिकाणी हुन कर्ता हनुमान मंदिर आरती व पावली ने या एक महिना महिलाचा फार मोठा सहभाग असतो व आकर्षण रांगोळ्या व दिवे लावलेले असतात या काकडा आरती मध्ये विना वादक ह भ प सुखदेव वाडकर महाराज,पुजारी आरती घेणारे संजय बहाळ, मुदग वादग ह भ प गजानन माळी व भिका भगत, व मानकर,गायक मनून ह भ प प्रकाश कुलट,दत्ता वैध,भीमराव ठाकरे,सेलसींग सिसोदिया,संजय वेध,घोडस्कर, एक महिना चालणाऱ्या काकडा आरती चे सूत्र संचालन कर्ता हनुमान मंडळाचे अध्यक्ष माजी सैनिक सुभाषराव म्हैसने यांनी केले तर सकाळी देवाला आंगोळ ड्रेस बदलली करण्याची जबादारी विठ्ठल चिकटे व माजी सैनिक लक्ष्मण मोरे,संजय देशमुख,अनुराग आठवले,गजानन धरमकर,वसंत,जायदे,गजानन माळी,राजेंद्र मालानी,अर्जुन राऊत,अशोक भिलकर,महादेव खडसाळे,अनिल गावंडे,राजू टेकाडे,हिमंतराव पोहरे,दिवाकर देशमुख,शरद लोटे,चंद्रकांत ताठे,डॉक्टर प्रमोद हेलगे, मुरलीधर आवटे,विलास आगरकर,भगवान पटोकार,रमेश शेरेकर,भिकूलाल पोपट,प्रल्हाद शेळके,शांताराम रोहनकार,दत्ता अर्बट,देवालाल उजाडे,ओमप्रकाश चांडक,प्रभाकर ठाकरे आदि उपस्थित होते.

# अकोला नाक्यावर रक्तरंजित हल्ला

## गुन्हेगारावरच भरदिवसा प्रहार!

■अकोला,दि ७ (प्रतिनिधी) :

मुर्तीजापुर तालुक्यातील अकोला नाक्यावर सोमवारी दुपारी तब्बल चित्रपटाला साजेशी थरारक घटना घडली. तीन-तीन गुन्ह्यांमध्ये आरोपी असलेल्या कोकणवाडीतील वाईन बार व्यवसायिक आदित्य सुदेष महाजन (वय २६) याच्यावर भरदिवसा जीवघेणा हल्ला झाला. दुपारी बाराच्या सुमारास आदित्य हा चहाच्या दुकानाजवळ उभा असताना जुनी वस्तीत राहणारा मुसेफ अचानक तिथे धडकलाच.

तु तन्मय दुबे सोबत शॉट केलाङ्ग या कारणावरून तुफान वाद पेटला आणि क्षणार्धात आरोपीने आदित्यच्या डोक्याच्या मागील बाजूस काहीतरी वस्तूने जबर मार हाणला. रक्त ओघळताच तो खाली कोसळला; एवढ्यावर न थांबता आरोपीने त्याच्या गळ्यातील सोन्याची चेन हिसकावून नेली. रक्तरंजित घटनेने अकोला नाक्यावर एकच गोंधळ उडाला. लोकांनी ओरडून पाहिले तरी आरोपी फरार झाला. घटनेची माहिती मिळताच मुर्तीजापुर शहर पोलिस स्टेशनचे डे ऑफिस हेड कॉन्स्टेबल प्रभाकर नागे (ब.नं.१५२४) यांच्या आदेशाने एचसी मंगेश विल्हेकर (ब.नं.१४६२) यांनी अप. क्र. ४४६/२०२५ भा.न्या.सं. कलम ११९(१), ११८(१), ३५१(३) प्रमाणे गुन्हा दाखल करून तपासाची चक्रे वेगाने फिरवली आहेत.दरम्यान, फिर्यादीवर आधीच तीन गुन्हेङ्खअप. क्र. ३८२/२५, १८९/२५ आणि ४३७/२५ विविध कलमांतर्गत दाखल असल्याने या हल्ल्यामागे जुना राग, व्यवहारातील वाद की टोळीगत रुसवा, याबाबत पोलीस सखोल तपास करत आहेत.

# राष्ट्रीय एकात्मतेसाठी महात्मा गांधींच्या विचाराची गरज : बबनराव कानकिरड

**श्री शिवाजी महाविद्यालयात महात्मा गांधी जयंतीनिमित्त व्यसनमुक्तीचा जागर**

■अकोला,दि ७ (प्रतिनिधी) :

विविध जाती, धर्म, भाषा,प्रांत यामध्ये विखुरलेल्या भारताला एक संघ ठेवण्यासाठी सर्वोदय कार्यकर्ते सदैव धडपडत आहेत. राष्ट्रीय एकात्मता अखंड ठेवण्यासाठी महात्मा गांधींचे विचाराची गरज असल्याचे प्रतिपादन सर्वोदय मंडळाचे जिल्हाध्यक्ष बबनराव कानकिरड यांनी केले. श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री जयंतीनिमीत्त व्यसनमुक्ती जागर कार्यक्रमात बोलत होते. वाणिज्य विभाग प्रमुख प्रा.डॉ.संजय तिडके कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. कनिष्ठ महाविद्यालय प्रमुख प्रा. सुशीला मळसणे,कला शाखाप्रमुख डॉ. अर्चना पोटे, वाणिज्य शाखाप्रमुख डॉ. अस्मिता बढे, विज्ञान शाखाप्रमुख प्रा. श्रीकृष्ण



तराळे व सांस्कृतिक प्रमुख प्रा. रूपाली सरोदे यांची प्रमुख उपस्थिती होती. राष्ट्रपिता महात्मा गांधी,लालबहादूर शास्त्री व शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमा पूजना नंतर रोपट्यांना जलार्पण करून कार्यक्रमाची पर्यावरणपूरक सुरुवात करण्यात आली. प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय डॉ. अर्चना पोटे यांनी करून दिला. कमी रामराव पाटेखेडे यांनी व्यसनमुक्ती वर कविता सादर करून ज्ञानरंजन केले. धार्मिक कडवेपणा वाढणे, विज्ञान विरोधी मानसिकता वाढणे, अतिरेकी व्यक्तिवाद वाढणे देशासाठी घातक ठरू शकते. ज्ञानेंद्रियांना अविवेक आणि अंधश्रद्धेची काजळी चढणार नाही यासाठी महात्मा गांधींचा सर्वोदय विचार मना मनात रुजवण्याची गरज आहे. तरुणांमधील वाढत्या व्यसनाधीनतेला आवर घालण्यासाठी नशाबंदी मंडळामार्फत व्यसनमुक्ती सप्ताह राबवीला जात असल्याची माहिती बबनराव कानकिरड यांनी दिली. महात्मा गांधीजींच्या सत्य, अहिंसा,शिस्त व बंधुभाव या मूल्यांची जोपासना करण्याचे आवाहन वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. डॉ. संजय तिडके यांनी अध्यक्षीय भाषणातून केले. प्राचार्य डॉ. रामेश्वर भिसे यांच्या संकल्पनेतुन महात्मा गांधी जयंती निमित्त व्यसनमुक्ती सप्ताह साजरा करण्यात येत आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शिल्पा शिंदे यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा.सुशील जाधव यांनी केले. कार्यक्रमाला सर्वोदय व नशाबंदी मंडळाचे कार्यकर्त्यांसह कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय विद्यार्थी, प्राध्यापक मोठ्या संख्येत मोठ्या संख्येत उपस्थित होते.

## थोडक्यात

### अकोल्यात एसटीच्या ई–बस सेवेस प्रारंभ!

**अकोला :** पर्यावरणपुरक, वातानुकुलीत आरामदायी प्रवासी सेवा म्हणून एसटी महामंडळाने राज्यात ईलेक्ट्रिक बस सेवा सुरू केली असून अकोल्यात सोमवार, ६ ऑक्टोंबरपासून महामंडळाच्या ई- बससेवेला प्रारंभ झाला आहे. सोमवारी सकाळी ९.३० वाजता मध्यवर्ती शहराच्या बसस्थानकातून अकोला ते अमरावती, अकोला ते वाशिम आणि अकोला ते बाळापूर या मार्गासाठी ई–बसेस धावल्या. या बसमध्ये प्रवाशांनी वातानुकुलीत, पर्यावरणपुरक प्रवास अनुभवला. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, अकोला विभागाच्या या पहिल्या विद्युत प्रणालीवरील बसचे लोकार्पण सोमवारी मध्यवर्ती बस स्थानकावर करण्यात आले. कंपनीचे छत्रपती संभाजीनगर येथील व्यवस्थापक बनसोडे, आगार क्रमांक २ चे व्यवस्थापक सुभाष भिवटे, मध्यवर्ती बसस्थानक व्यवस्थापक नरेश खंडारे आदी एसटी महामंडळाचे अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ई–बस प्रवासे सेवेचा प्रारंभ झाला. एसटी महामंडळाने शिवशाही वातानुकूलित बस सेवेनंतर शिवाई ही ई–बस सुरू झाली असून एसटी महामंडळाच्या अकोला विभागाने ई- बस सेवेसाठी आवश्यक असणारे सर्व सुविधा उपलब्ध करुन दिले आहे. महामंडळाच्या कौलखेड स्थित विभागीय वर्कशप येथे ई–बस साठी चार्जिंग सेंटर उभारण्यात आले आहे. यामध्ये ४३ लोक प्रवास करू शकणार आहेत. याचा वेग ८० किमी प्रतितास असणार असून लवकरच टप्प्याटप्प्याने व्याप्ती वाढविण्यात येणार आहे. अकोला विभागाला आणखी काही ई–बसे उपलब्ध होणार आहे. त्यानंतर ईतरही मार्गावरही बस सेवा सुरूकरण्यात येतील. पहिल्या टप्प्यात अकोला ते अमरावती, अकोला ते वाशिम, अकोला ते बाळापूर यादरम्यान इ- बस सेवा सुरू झाली आहे.

# समाज कल्याण कार्यालयात जेष्ठ नागरिक दिन साजरा

■अकोला,दि ७ (प्रतिनिधी) :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे सहाय्यक आयुक्त, समाज कल्याणतर्फे जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरिकांना निमंत्रित करून ज्येष्ठ नागरिक दिन नुकताच साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमाकरिता जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरिक मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. सदर कार्यक्रमाच्या प्रसंगी जिल्हा समन्वय समितीचे अशासकीय सदस्य नारायणराव अंधारे उपस्थित होते व प्रमुख अतिथी जिल्हा समन्वय समिताचे उपाध्यक्ष ना.मा.मोहोड, विनायक पांडे, चंद्रकांत कुळकर्णी, प्रा.डॉ. सत्यनारायण बाहेती, रमेश बाहेती, तुळिशराम बोबडे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रज्ञा खंडारे यांनी व प्रास्ताविक विनोद शिरसाट यांनी ज्येष्ठ नागरिक कायदा २००७ बाबत माहिती सांगितली. या कार्यक्रमामध्ये उपस्थित मान्यवर यांनी ज्येष्ठ नागरिकांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या प्रमुख वक्ता म्हणून पातुर येथील आयुर्वेदिक महाविद्यालयाचे प्रा.डॉ. सुनिता कदम यांनी आहार पध्दती विषयी तसेच आयुर्वेदाविषयी विश्लेषनात्मक माहिती दिली. कार्यक्रमामध्ये ज्येष्ठ नागरिकांची जिल्हा शासकीय रुग्णालय येथील शल्यचिकित्सक डॉ. अशोक जाधव, दंत शल्यचिकित्सक डॉ.अदिती साखीकर, फिजीशीयन डॉ. श्रेया अग्रवाल आणि त्यांच्या पथकामार्फत मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली व उपस्थित ज्येष्ठ नागरिकांच्या समस्या व आरोग्य विषयक घ्यावयाची काळजी बाबत मार्गदर्शन केले. समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त एम.जी.वाठ यांनी ज्येष्ठ नागरिक कायदा २००७ मधील तरतुदी तसेच धोरणाविषयी माहिती दिली. शासनाच्या विविध विभागाच्या तसेच सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातील ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेल्या सोई–सुविधांविषयी माहिती देण्यात आली. सदर विभागाने नव्याने सुरू करण्यात आलेल्या तसेच यापुर्वी सुरू करण्यात आलेल्या सर्व योजनांचा जिल्ह्यातील ज्येष्ठ नागरिकांनी जास्तीत जास्त संख्येने लाभ घ्यावा, असे अ ा व ा ह नकरण्यात आले. तसेच विविध बाबींविषयी मार्गदर्शन करण्यात आले. सर्व जेष्ठ नागरिकांना जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त शुभेच्छा देण्यात आल्या.

# सेंद्रिय सीताफळ विक्रीसाठी उपलब्ध!

**डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या मध्यवर्ती संशोधन केंद्राचा उपक्रम!**

■अकोला,दि ७ (प्रतिनिधी) :

सान–थोरांच्या सर्वांच्या आवडीचे आरोग्यदायी फळ म्हणून सीताफळाची सर्व दूर ओळख आहे. सीताफळ हे कोरडवाहू पीक असून माळरानावर देखील सहज उगवते आणि लागवडीसाठी सोपे असते. सीताफळाचे वैशिष्ट्य म्हणजे ते एक पौष्टिक आणि आरोग्यदायी फळ आहे, ज्यामध्ये भरपूर कर्बोदके, खनिजे आणि जीवनसत्त्वे आढळतात. हे फळ आतून गोडसर आणि क्रीमसारख्या गराचे असते, ज्याला एक विशिष्ट चव असते. बाहेरून खवलेदार दिसणारे हे फळ, शरीराला ऊर्जा देते आणि रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी उपयुक्त आहे. सीताफळाचे झाड ३ ते ६ मीटर उंच वाढू शकते आणि त्याला जाडसर फांद्या असतात, ज्यांना गडद हिरवी पाने असतात. यांची फळ आकाराने गोलसर किंवा हृदयाकृती असते आणि त्यावर खवलेसर



रचना दिसते. आतून त्याचा गर पांढरा, गोडसर असतो आणि त्यात काळसर रंगाच्या बिया असतात. तसेच सीताफळ सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाचे आहे आणि पारंपरिक औषध पद्धतींमध्ये त्याचा उपयोग केला जातो.

**पौष्टिक मूल्य:** सीताफळात कॅल्शियम, लोह, थायमीन (इ१), रिबोफ्लेविन (इ२), आणि 'क' जीवनसत्त्व यांसारख्या अनेक पोषक घटकांचा साठा असतो.

या फळामध्ये अँटीऑक्सिडंट गुणधर्म असतात, ज्यामुळे अनेक जुनाट आजार दूर राहण्यास मदत होते. नैसर्गिक शर्करा असल्याने, सीताफळ शरीराला त्वरित ऊर्जा देते, जे सकाळच्या किंवा दुपारच्या वेळी खाण्यासाठी उपयुक्त आहे.

# सरन्यायधीश गवई यांचा अवमान करणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी

■अकोला,दि ७ (प्रतिनिधी) :

सर्वोच्च न्यायालयातील मनुवादी विचारांचा वकील राकेश किशोर याने सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायधीश बी.आर. गवई यांच्यावर बूट फिरकावून त्यांचा व पर्यायाने संविधान चा अवमान केला आहे.सबब अश्या मनुवादी वकील राकेश किशोर याच्यावर कायदेशीर कारवाई करीत त्याची सनद रद्द करण्याची मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरदचंद्र पवारच्या सामाजिक न्याय विभागाच्या वतीने करण्यात आली. राष्ट्रवादी श प चे जिल्हाध्यक्ष संग्राम गावंडे यांच्या नेतृत्वात मंगळवारी राष्ट्रपती यांना जिल्हाधिकारी यांच्या मार्फत निवेदन देऊन या घटनेचा तीव्र निषेध करण्यात आला. लोकशाही शासनपद्धती आणि कायद्याचे राज्य या मनुवाद्यां ना उलथवून टाकून मनुवादी व्यवस्था पुनर्स्थापित करायची आहे. हाच त्यांचा उद्देश या घटने संदर्भात दिसून येत असल्याचे संग्राम गावंडे यांनी



निवेदनात नमूद केले. सबब अवमान करणाऱ्यांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करून त्याची सनद रद्द करण्याची मागणी निवेदनात करण्यात आली. यावेळी जिल्हा महासचिव आनंद पिंटू वानखडे, सौ विद्याताई अंभोरे, सामाजिक न्याय जिल्हाध्यक्ष गजानन भटकर, महिला जिल्हाध्यक्ष कोकीळाताई वाहूरवाघ, जिल्हा उपाध्यक्ष परिमल लहाने, कैलास गोंडचवर शामराव वाहूरवाघ, जिल्हा सरचिटणीस राजेंद्र इंगोले, तालुका अध्यक्ष अजय पागृत, राजेश राऊत, महिला महानगर अध्यक्ष सरलाताई वरघट, युवती अध्यक्ष मेघाताई पाचपोर, मंगलाताई सोनवणे, संगीताताई दाळू, सुनीताताई ताथोड, धनश्री सोनी,विद्यार्थी प्रदेश सचिव शैलेश बोदडे, मारोती उंबरकर,योगेश सोनोने, सिकंदर मर्दाने,अतुल डीक्कर, जॉन्सन वरघट समवेत बहुसंख्य पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# शी–बॉक्स' पोर्टलवर नोंदणी करण्याचे आवाहन

■अकोला,दि ७ (प्रतिनिधी) :

कामाच्या ठिकाणी महिलांचे होणारे लैंगिक शोषण रोखण्यासाठी केंद्र सरकारने एक महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. महिला व बालविकास मंत्रालयाने 'शी–बॉक्स' हे ऑनलाइन तक्रार निवारण पोर्टल सुरू केले आहे. आता या पोर्टलवर सर्व खाजगी आस्थापनांना नोंदणी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम, २०१३ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. या कायद्यानुसार, ज्या आस्थापनांमध्ये १० किंवा त्याहून अधिक कर्मचारी आहेत, तेथे अंतर्गत तक्रार निवारण समिती असणे आवश्यक आहे.'शी–बॉक्स' पोर्टल मुळे महिला कर्मचाऱ्यांना त्यांच्या तक्रारी ऑनलाइन नोंदवणे आणि त्याचा पाठपुरावा करणे सोपे होणार आहे.

# शिष्यवृत्ती अर्जांची प्रक्रिया पूर्ण करून घेण्याचे आवाहन

■अकोला,दि ७ (प्रतिनिधी) :

अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे भारत सरकार मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ती, राज्य शासनाच्या शिक्षण शुल्क, परीक्षा शुल्क प्रतीपूर्ती योजना, राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती आणि व्यावसायिक अभ्यासक्रमात शिकत असलेल्या अनुसूचित जातीच्या मुला–मुलींना निर्वाह भत्ता या योजना माहिती व तंत्रज्ञान विभाग महाराष्ट्र शासन यांनी विकसित केलल्या महाडिबीटी पोर्टल या प्रणालीदवारे ऑनलाईनरित्या राबविण्यात येत आहेत.

या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२५–२६ करिता महाडीबीटी पोर्टलवरून नवीन व नुतणीकरण या अर्जाची ऑनलाईन स्विकृती दि.३० जून २०२५ पासून करण्यात आलेली आहे. शिष्यवृत्तीकरिता महाडिबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करणे ही बाब विद्यार्थ्यांच्या प्रवेश प्रकियेचाच भाग असून सदर कार्यवाही संबंधित महाविद्यालयाने प्रवेश प्रक्रिया चालू असतांनाच पूर्ण करणे आवश्यक आहे.तथापि अद्याप अनुसूचित जाती या प्रवर्गातील केवळ २ हजार ३३९ अर्जच नोंदणीकृत झालेले आहे. करिता शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मधील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी भारत सरकार मॅट्रिकोत्तार शिष्यवृत्ती या योजनेचे अर्ज लवकरात लवकर भरावे. जेणेकरून मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीच्या रकमेची अदायगीची पुढील प्रक्रिया करणे सोयीचे होईल, असे आवाहन मारोती वाठ, सहायक आयुक्त समाज कल्याण अकोला यांनी केले आहे.

## अकोला वन्यजीव वनपरिक्षेत्रात 'जागतिक वन्यजीव सप्ताहनिमित्त' विविध कार्यक्रमाद्वारे जनजागृती



■बार्शिटाकळी,दि ७ (प्रतिनिधी) : अकोला वन्य जीव वनपरिक्षेत्रात जागतिक वन्यजीव सप्ताह निमित्त मा. श्री अनिल निमजे, विभागीय वनाधिकारी अकोला वन्यजीव विभाग, अकोला यांच्या मार्गदर्शनात कारंजा-सोहळ अभयारण्य येथे मा. श्री चेतन राठोड सर सहाय्यक वनसंरक्षक (वन्यजीव) अकोला यांच्या हस्ते वृक्षारोपन करून सुरुवात करण्यात आली. त्यानंतर अकोला येथे निसर्ग कट्टा चे प्रमुख यांच्या मार्ग दर्शनात डॉ. हेडगेवार रक्त संकलन पेढी अकोला येथे आयोजित रक्तदान शिबिरामध्ये वनकर्मचारी यांनीसक्रिय सहभाग घेऊन रक्तदान केले. मंगरूळपीर येथील यशवंतराव चव्हाण महाविद्यालय येथील विध्यार्थीनी द्वारे काटेपूर्णा अभयारण्य येथे वन्यप्राण्याच्या विविध रांगोळीद्वारे वन्यजीव यांचे संरक्षणाचा संदेश दिला तसेच कारंजा सोहळ अभयारण्याच्या भेटी दरम्यान श्री आदित्य इंगोले सर्प मित्र वनोजा यांनी माहिती दिली. यानंतर कासमार, फेट्रा व वाघा या गावातील जि. प. प्राथमिक मराठी शाळेच्या विद्यार्थी यांना स्लाईड द्वारे करून निसर्ग संरक्षनाचा संदेश दिला. त्यानंतर निसर्गकट्टा अकोला चे श्री अमोल सावंत व अकोला वन्यजीव विभागामार्फत श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय चे विद्यार्थी व विद्यार्थीनी येवून त्यांना काटेपूर्णा येथील जंगलात निसर्गभ्रमंती करून जंगलातील वेगवेगळे पशु पक्षी यांची माहिती व ओळख करून देण्यात आली. अकोला येथील श्री पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातील वनशास्त्र शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना कॅमरा ट्रॅप व वन्यजीव यांच्या बद्दल माहिती मा. श्री महेश खोरे विभागीय वनाधिकारी सामाजिक वनीकरण विभाग, अकोला यांनी दिली. गुलाब नबी आझाद महाविद्यालय, बार्शी टाकळी व ठङढ कॉलेज अकोला येथील विद्यार्थी यांनी सुद्धा काटेपूर्णा अभयारण्य येथे भेट देवून वन्यजीव संरक्षणा विषयी माहिती जाणून घेतली. या कार्यक्रम करिता श्री अमित शिंदे वनपरिक्षेत्र अधिकारी (वन्यजीव) अकोला परिक्षेत्र वनपाल श्री तुपकर, करवाडे सर्व श्री कांबळे, पोटे, सुरणे, राठोड, पाथरकर, गिरी, कु. यादव यांनी परिश्रम घेतले.

## राज्याच्या नव मांडणीची आज गरज-प्रा वाकुडकर

■अकोला,दि ७ (प्रतिनिधी) : राज्याची सर्व क्षेत्रात होत असलेली पीछेहाट व परिस्थिति बघता राज्यात आज नवं मांडणीची गरज असून विकासाच्या दृष्टीने हा नवा परीघ निर्माण करण्याची गरज असल्याचे मत नागपूर येथील व्याख्याते प्रा ज्ञानेश वाकुडकर यांनी व्यक्त केले. बाबूजी देशमुख वाचनालयाच्या वतीने स्थानीय प्रमिलाताई ओक सभागृहात सुरू असलेल्या ९ दिवसीय नवरात्र व्याख्यानमालेचे प्रा वाकुडकर यांनी चतुर्थ पुष्प गुंफले.उद्याचा महाराष्ट्र कसा असावा? या विषयावर त्यांनी आपल्या व्याख्यानात ऊहापोह केला.

ते पुढे म्हणाले,गाव म्हणजे विश्वाचा नकाशा, गावावरून देशाची परीक्षा ही संत तुकडोजी महाराज यांच्या ग्रामगीताची ओवी खरी करून दाखविण्याची स्थिति निर्माण झाली आहे. ते म्हणाले, राज्याची विकासाची परीक्षा खऱ्या अर्थाने समाजाच्या एकंदर स्थितीवर अवलंबून असते. आपले वास्तविकरीत्या राजकीय प्रबोधन झालेच नाही. अगदी साधे मतदान कुणाला करावे हे ही मतदारांना माहीत नसते.ते म्हणाले, देशाला जिवंत ठेवण्याचे काम हे खऱ्या अर्थाने शेतीचेच आहे. कास्तकार समृद्ध व विकसित झाला पाहिजे. त्याचे अनंत प्रश्न हे शासनाने सोडले पाहिजेत.

## पातूर तहसील समोर शेतकऱ्यांच्या समस्यांसाठी निलेश कापकर यांचे आमरण उपोषण सुरू

## तालुक्यातील शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न



■पातुर,दि ७ (प्रतिनिधी) : पातूर तहसील कार्यालयासमोर सामाजिक कार्यकर्ते निलेश तोताराम कापकर यांनी आज, मंगळवार दिनांक ७ ऑक्टोबर २०२५ पासून शेतकऱ्यांच्या ज्वलंत समस्यांवर उपाययोजना व्हाव्यात या मागणीसाठी आमरण उपोषण सुरू केले आहे.

यावर्षी पातूर तालुक्यात सततचा धार पाऊस झाल्यामुळे मोठ्या प्रमाणात ओल्या दुष्काळाचे संकट निर्माण झाले आहे. शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले असून, त्यांच्या विविध मागण्या शासनापुढे प्रलंबित आहेत. या पार्श्वभूमीवर निलेश कापकर यांनी तहसील कार्यालयासमोर उपोषणाचा मार्ग अवलंबला आहे.पातूर तालुक्यास ओला दुष्काळग्रस्त घोषित करून शेतकऱ्यांना हेक्टरी ८० हजार रुपये मदत द्यावी.सर्व शेतकऱ्यांची सरसकट कर्जमाफी करावी.

ही मदत दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात यावी.येणाऱ्या रब्बी हंगामासाठी बी-बियाणे व खत मोफत उपलब्ध करून द्यावेत. पिक विमा योजना केवळ एक रुपयात राबवावी. ज्यांच्या खात्यात पीएम किसान योजनेचे पैसे येत नाहीत, त्यांना तात्काळ लाभ सुरू करावा.मदत वाटप करताना सर्व शेतकऱ्यांमध्ये कोणताही भेदभाव न करता समान मदत द्यावी.शेतरस्ते चांगल्या दर्जाचे बांधावेत व आधी झालेल्या निकृष्ट दर्जाच्या कामाची चौकशी करावी.पुरामुळे पडघर झालेल्या शेतातील विहिरींसाठी मदत द्यावी.शेतकऱ्यांच्या मुलांचे २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाचे शुल्क माफ करण्यात यावे.पुरात वाहून गेलेल्या जनावरांसाठी प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत मिळावी.या उपोषण मंडपाला आज विविध राजकीय आणि सामाजिक नेत्यांनी भेट देऊन पाठिंबा दर्शविला. पातूर नगरपरिषद माजी नगराध्यक्ष आणि काँग्रेस नेते हिदायतखान रूमखान इद्दू पहेलवान, भाजपाच्या पदाधिकारी सौ. वर्षाताई संजय बगाडे, आदर्श गोसेवा प्रकल्पाचे अध्यक्ष सुभाष दादा जैन, कृष्णा भाऊ अंधारे, गजानन शिंदे, माजी तालुका शिवसेना प्रमुख भाजपाचे ज्ञानेश्वर जाधव, छोटू भाऊ देशमुख, तसेच अॅड. उमेश शिंदे आणि रक्षण देशमुख यांनी उपोषण स्थळी भेट देऊन निलेश कापकर यांना आपला पाठिंबा जाहीर केला आहे.

या सर्वांनी शासनाला मागणी केली आहे की, शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन तात्काळ निर्णय घेतला जावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल.

### खा अनुपभाऊ धोत्रे व आ. हरिषभाऊ पिंपळे यांच्यावर आक्षेपार्ह पोस्ट टाकल्याच्या विरोधात

## भाजपा बाळापुर ग्रामीणच्या वतीने उरळ पोलीस स्टेशनला तक्रार दाखल

■अकोला,दि ७ (प्रतिनिधी) : भारतीय जनता पार्टी बाळापूर ग्रामीण मंडळ पदाधिकार्यांच्या उपस्थितीत जिल्ह्यातील लोकप्रिय खासदार श्री.अनुपदादा धोत्रे तसेच मूर्तिजापूर मतदार संघाचे लोकप्रिय आमदार श्री.हरीशजी पिंपळे साहेब तसेच भाजपा पक्ष विरुद्ध समाजमाध्यमावर खोटी बदनामी व चुकीचे व्यंगचित्र तयार करून आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्याच्या विरोधात उरळ पोलीस स्टेशन येथे तक्रार अर्ज दाखल करण्यात आला.ह्या वेळी तालुकाध्यक्ष किशोर कुचके,ओबीसी जिल्हाध्यक्ष आनंद पुंडे,जिल्हा सचिव विलास भाऊ पोटे,सरचिटणीस राजेश्वर वैराळे,



माधव म्हसने,दिलीप पटोकार, अजिंक्य राऊत,बंडूभाऊ माळी, योगेश ढोरे,श्याम पोहरे,प्रमोद वानखडे,संजय अघडते,सुभाष धुमाळे, गजानन कराळे, सुनील ढोकणे,अतुल थोटे, मंगेश भिवटे सर, विनायक वैराळे,नंदकिशोर तायडे, विजय फुकट,प्रेम सागर वानखडे, रमेश मांगटे,भगवंता दांदळे, हरीभाऊ टेकाडे, नवकार महाराज, नकुल वाकडे,आकाश वाकडे,अमोल दुतोंडे,तुषार ताले,ज्ञानेश्वर मानकर,सुरेश मेहरे,निलेश

### खा. अनुप धोत्रे, आ. हरीश पिंपळे यांच्यावर आक्षेपार्ह पोस्ट टाकल्याच्या विरोधात

## भाजपाने केली बाळापुर पोलीस स्टेशनला तक्रार दाखल

■अकोला,दि ७ (प्रतिनिधी) : अकोला मतदारसंघाचे युवा खा. अनुपदादा धोत्रे आ. हरीश भाऊ पिंपळे यांच्यावर आक्षेपार्ह पोस्ट टाकल्याच्या विरोधात भाजपा बाळापुर तालुक्याच्या वतीने तक्रार अर्ज दाखल केला भारतीय जनता पार्टी बाळापुर तालुक्याच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत भाजपाच्या वतीने काही समाज विधायक मंडळी राज्य सरकार तसेच लोकप्रिय खासदार अनुप दादा धोत्रे साहेब तसेच मूर्तीजापुर मतदार संघाचे लोकप्रिय आमदार हरीश भाऊ पिंपळे तसेच भाजपा पक्षाविरुद्ध समाज माध्यमावर खोटी बदनामी व चुकीचे



व्यंगचित्र तयार करून आक्षेपार्य पोस्ट करणाऱ्या विरोधात तक्रार अर्ज बाळापुर पोलीस स्टेशनला दाखल करण्यात आला यावेळी भाजपा बाळापुर शहर च्या वतीने सौ छायाताई मानकर सौ अर्चनाताई मसने नितीन लांडे राहुल लोध मुक्तार खान मनोज बनचरे चैतन्य अंबाडे गजानन खारोडे रमेश लोहकरे प्रितेश गुजराती महेंद्रसिंग पेजवर गुफ्रान साजिद अभिमन्यू नळकांडे अंकुश शहाणे शिवदास मानकर संतोष नळकांडे शिवा मसने अमोल राऊत दीपक हिरळकर गोपाल पाटील शे दिशान शरीफ मो सिद्दिकी राजा या सर्व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत अर्ज दाखल करण्यात आला

### अण्णासाहेब पाटील महामंडळाचा मोठा निर्णय

## व्याज परताव्यासोबतच आता उद्योजकता प्रशिक्षण

■अकोला,दि ७ (प्रतिनिधी) : आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या तरूणांना सक्षम उद्योजक बनविण्यासाठी कार्यरत असलेल्या अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ ने एक महत्त्वाकांक्षी पाऊल उचलले आहे. महामंडळ आता केवळ बैंक कर्जावरील व्याज परतावा योजनाच नाही, तर लाभार्थ्यांना त्यांच्या व्यवसायासाठी आवश्यक असलेले प्रशिक्षण व मार्गदर्शन देखील देणार आहे.

हा निर्णय तरूण उद्योजकांना केवळ आर्थिक मदत न देता, त्यांना व्यवसाय यशस्वीपणे चालवण्यासाठी आवश्यक ज्ञान आणि कौशल्य मिळवून देण्याच्या उद्देशाने घेण्यात आला, अशी माहिती महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विजयसिंह देशमुख यांनी दिली. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्यावतीने त्वरीत कार्यवाही सुरू करून उद्योग-सारथी प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत दि. २४ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता ऑनलाईन वेबिनारचे आयोजन करण्यात आले होते. ज्यामध्ये राज्यभरातील इच्छुक लाभार्थ्यांनी सहभाग घेतला. या वेबिनारमध्ये 'पशुपालन आणि दुग्ध व्यवसाय' या महत्त्वपूर्ण विषयावर पुणे कृषी विद्यालयाचे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. सोमनाथ माने यांनी मार्गदर्शन केले.

हे वेबिनार युट्युब समवेत फेसबुकवर देखील लाईव स्वरूपात दाखविण्यात आले होते.यावेळी अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या लाभार्थ्यांसाठी या प्रशिक्षणात डॉ. माने यांनी दुग्ध व्यवसायात यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेल्या अनेक बाबींवर प्रकाश टाकला. ज्यामुळे नवीन आणि इच्छुक उद्योजकांना मोलाचे मार्गदर्शन मिळाले.

उत्तम जातीच्या जनावरांची निवड दुग्ध व्यवसायासाठी अधिक दुध देणाऱ्या जातीच्या गाई-म्हशींची निवड कशी करावी, याचे मार्गदर्शन डॉ. माने यांनी केले. यामध्ये गीर, साहिवाल, जर्सी यांसारख्या देशी आणि विदेशी जातींची माहिती दिली. आहाराचे महत्त्व जनावरांच्या आरोग्यासाठी आणि दुधाचे उत्पादन वाढविण्यासाठी योग्य आहार कसा असावा, यावर त्यांनी भर दिला. संतुलित आहार, हिरवा आणि सुका चारा तसेच आवश्यक खनिज मिश्रणे यांचे महत्त्व सांगितले.

आरोग्याची काळजी जनावरांना होणारे आजार आणि त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना याबद्दल सखोल माहिती दिली. वेळोवेळी लसीकरण करणे, स्वच्छतेचे नियम पाळणे आणि आजार झाल्यास त्वरित उपचार करणे यावर मार्गदर्शन केले. आर्थिक नियोजन दुग्ध व्यवसाय सुरू करण्यासाठी आवश्यक भांडवल, शासनाच्या विविध योजनांचा लाभ कसा घ्यावा, तसेच दुधाची विक्री आणि मार्केटिंग याबद्दलही त्यांनी मौल्यवान मार्गदर्शन केले.नवीन तंत्रज्ञान दुधाचे उत्पादन वाढविण्यासाठी आणि व्यवस्थापन सोपे करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून दिली.

या वेबिनारमुळे अण्णासाहेब पाटील महामंडळाच्या लाभार्थ्यांना केवळ आर्थिक मदती शिवाय व्यवसायासाठी आवश्यक तांत्रिक आणि व्यवस्थापकीय ज्ञानही मिळाले. डॉ. माने यांचे मार्गदर्शन हे त्यांच्या व्यवसायाच्या यशस्वी वाटचालीस नक्कीच उपयुक्त ठरेल, असे डॉ. माने यांनी मार्गदर्शन करताना सांगितले. दुग्ध व्यवसाय हा केवळ उत्पन्नाचा स्रोत नाही तर ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी देणारा एक महत्त्वाचा घटक आहे. योग्य प्रशिक्षण, नियोजन आणि शाश्वत व्यवस्थापन यामुळे हा व्यवसाय मोठ्या प्रमाणात यशस्वी होऊ शकतो. राज्यभरातून अनेक युवक, महिला उद्योजिका व स्वयंसहाय्यता गटांचे प्रतिनिधी या वेबिनारला ऑनलाईन उपस्थित होते.

## ग्रामिणांना मिळेल शुद्ध, पुरेसे पाणी !

■अकोला,दि ७ (प्रतिनिधी) : ग्रामीण भागातील जनतेला शुद्ध आणि पुरेसे पाणी उपलब्ध व्हावे या उद्देशाने जिल्हा परिषदेच्या वतीने सार्वजनिक पिण्याच्या पाण्याचे स्रोतांचे स्वच्छता सर्वेक्षण सुरू झाले असून, हे सर्वेक्षण १ ते ३० ऑक्टोबर या कालावधीत पूर्ण केले जाणार आहे. जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षातर्फे पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाच्या शासन निर्णयानुसार, दरवर्षी मान्सून पूर्व व मान्सून पश्चात जलस्रोतांची तपासणी केली जाते. स्वच्छतासर्वेक्षणामध्ये जलस्रोताभोवतीचा परिसर, पाणीपुरवठा योजनेचे उपांग यांची बारकाईने तपासणी केली जाईल.त्रुटीनुसार सर्वेक्षणादरम्यान आढळलेल्या ग्रामपंचायतींना जलस्रोतांच्या स्थितीनुसार लाल,हिरवे व पिवळे कार्ड दिले जाईल.

## डॉ. शशिकांत पवार यांचा सत्कार



■अकोला,दि ७ (प्रतिनिधी) : अखिल भारतीय मराठा महासंघ जिल्हा शाखा अकोला च्या वतीने नुकताच मराठा महासंघाच्या जिल्हा कार्यालयात मराठा उत्कर्ष सेवा समितीचे अध्यक्ष डॉक्टर शशिकांत पवार यांना भारतरत्न सरदार वल्लभभाई पटेल हिंदू रत्न पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन मराठा महासंघाचे मार्गदर्शक श्री देवराव पाटील, विदर्भ प्रदेश उपाध्यक्ष श्री राम मुळे, जिल्हाध्यक्ष श्री सुरेश ठाकरे, युवक अध्यक्ष श्री सतीश सुर्वे , यांचे हस्ते शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मराठा महासंघाचे जिल्हा उपाध्यक्ष प्रशांत गावंडे , सरचिटणीस के. एम. देशमुख ,विनायकराव गायकवाड, प्रा. रामराव बाजड, अमित देशमुख ,कृष्णाराव बावणेर, प्रतीक धांडे ,गणेश बाठे आदी पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन जिल्हाध्यक्ष सुरेश ठाकरे यांनी केले तर आभार प्रदर्शन सरचिटणीस के. एम. देशमुख देशमुख यांनी केले.

## संघटन उभारणीसाठी कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे : गजानन हरणे

### रविवारी अकोला येथे स्वराज्य जनजागृती परिषदेची महत्त्वपूर्ण बैठक

■अकोला,दि ७ (प्रतिनिधी) : सामाजिक परिवर्तन, लोकजागृती आणि



लोकशाही मूल्यांची मुळं अधिक घट्ट करण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या स्वराज्य जनजागृती परिषद या संस्थेच्या स्थापनेसंदर्भातील एक महत्त्वपूर्ण बैठक रविवार, दिनांक १२ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी २ वाजता ,महात्मा फुले नर्सिंग स्कूल, सिद्धीविनायक हॉस्पिटलच्या बाजूला,नवीन बस स्टैंड मागे अकोला येथे आयोजित करण्यात आली आहे. समाजकार्याची ओढ असणाऱ्या आणि परिवर्तनाचे स्वप्न मनात बाळगणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांनी या बैठकीस मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे

**सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने एक नवे पाऊल**

आवाहन समाजसेवक गजानन हरणे यांनी केले आहे.या बैठकीस परिषदेचे संस्थापक अध्यक्ष आणि समाजकारण क्षेत्रातील प्रभावी व्यक्तिमत्त्व अजित एम. देशमुख हे विशेष मार्गदर्शनासाठी उपस्थित राहणार आहेत. देशमुख यांच्या नेतृत्वाखाली संस्थेने अल्पावधीत समाजातील अनेक स्तरांवर जनजागृतीची ठोस पावले उचलली आहेत. आता संस्थेच्या कार्याचा विस्तार राज्यभर करण्याच्या ध्येयाने ही बैठक विशेषतः महत्त्वाची ठरत असल्याचे हरणे यांनी सांगितले.या ठिकाणी होणाऱ्या चर्चेत केवळ संस्थेच्या आगामी वाटचालीबाबतच नव्हे, तर जिल्हा, तालुका, शहर, शाखेतील पदाधिकाऱ्यांची निवड आणि शेजारच्या जिल्ह्यांमध्ये संघटन उभारणी यासारख्या महत्त्वाच्या विषयांवर विचारमंथन करून निर्णय घेतले जाणार आहे. आज देशाच्या विकासासाठी, समाजातील सकारात्मक बदलासाठी आणि लोकशाही मूल्यांच्या बळकटीसाठी समर्पितपणे कार्य करणाऱ्या नव्या विचारांच्या कार्यकर्त्यांची गरज आहे. स्वराज्य जनजागृती परिषद ही त्या दिशेने एक सशक्त पाऊल आहे. त्यामुळे परिवर्तनाच्या या प्रवासात आपले योगदान नोंदवण्यासाठी आणि समाजकार्याच्या नव्या वाटा शोधण्यासाठी सर्व समाजप्रेमी कार्यकर्त्यांनी रविवारी होणाऱ्या बैठकीस अवश्य उपस्थित राहावे,ङ्घ असे आवाहन समाजसेवक गजानन हरणे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

### नॅशनल ट्रेकिंग कॅम्प, तिरुपती मध्ये

## एल.आर.टी. चा कॅडेट ओम भारती चा सहभाग

■अकोला,दि ७(प्रतिनिधी) : एन. सी. सी ग्रुप हेडक्वार्टर तिरुपती आंध्रप्रदेश बटालियनद्वारा दिनांक २५ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर २०२५ दरम्यान नॅशनल ट्रेकिंग कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. कॅम्प कमांडर कर्नल सचेंद्र दहिया व डेप्टी कॅम्प कमांडर कर्नल विक्रम प्रसन्न या दोघांच्या मार्गदर्शना अंतर्गत या कॅम्पचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय ट्रेकिंग कॅम्पसाठी भारतातील विविध राज्यातील ५०० हून अधिक एन. सी. सी. कॅडेट्स सहभागी झाले होते. प्रत्येक बटालियनमधील उत्कृष्ट कॅडेट्सला शिबिरात सहभागी होण्याची संधी मिळाली. या शिबिरासाठी अमरावती ग्रुप मधून १०२ कॅरेट्सची निवड करण्यात आली होती. यामध्ये ११ महाराष्ट्र बटालियन अकोलाच्या १४ कॅडेट्सची निवड या कॅम्पसाठी झाली होती.

श्रीमती लक्ष्मीबाई राधाकिसन तोष्णीवाल वाणिज्य महाविद्यालय अकोल्याचा कॅडेट ओम भारती यांची निवड या कॅम्पसाठी करण्यात आली होती. या कॅडेट्सला आंध्र प्रदेशच्या सामाजिक व सांस्कृतिक वारसाबद्दल तसेच विज्ञान व भौगोलिक स्थळांना भेट देण्याची संधी यामध्ये मिळाली. समुद्र सपाटीपासून ३२०० फूट उंचीवर ४७७६ पायऱ्या



असलेल्या तिरुमल्ला तिरुपती देवस्थानापर्यंत ट्रेकिंग करून जाण्याचा वेगळा अनुभव कॅडेट्सला मिळाला. कॅडेट्सनी ट्रेकिंगचा एक भाग म्हणून श्री. वेंकीतेश्वरा प्राणीशास्त्र उद्यान, प्रादेशिक विज्ञान केंद्र, श्री. वागुलमाथा मंदिर आणि दिव्यारामम पार्कलाही भेट दिली. कॅडेट ओम भारती या कॅम्प वरून परत आल्यानंतर महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. जी. जी. गोंडाणे व एन. सी. सी. अधिकारी कॅप्टन डॉ. अनिल तिरकर यांनी त्यांचा सत्कार करून अभिनंदन केले. तसेच बी.जी.ई. सोसायटीचे अध्यक्ष अॅड. मोतीसिंहजी मोहता, वरिष्ठ उपाध्यक्ष विजयकुमारजी तोष्णीवाल, कनिष्ठ उपाध्यक्ष अभिजितजी परांजपे, मानद सचिव डॉ. पवनजी माहेश्वरी उपस्थित होते.

## निधन वार्ता

### श्रीमती द्वारकबाई ताथोड



**अकोला** : नारायनराव ताथोड यांच्या मातोश्री श्रीमती द्वारकबाई शालिग्राम ताथोड वय ८७ रा निभोरा ता जि अकोला यांचे आज दिनांक ७/१०/२५ संध्याकाळी दुःख निधन झाले त्याची अंत यात्रा त्याचे राहते घर मु निभोरा ता जि अकोला येथून दिनांक ८/१०/२५ बुधवारी १० वाजता निघेल.

RNINO-46973/1986 महासागर अकोला
मालक,मुद्रक,प्रकाशक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले.
संपादक **श्रीकृष्ण तनसुखदास चांडक** मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक **पुरुषोत्तम ढोले** फोन ९८८१४८९४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# शेतकऱ्यांना मदत करण्याची आमची पूर्ण भूमिका

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :**



मुख्यमंत्री फडणवीस, अजित पवार, एकनाथ शिंदे हे एकत्र चर्चा करत शेतकऱ्यांना जी काही मदत करायची आहे त्यांची घोषणा करतील. तर केंद्र सरकारला प्रस्तावही पाठवतील. मुख्यमंत्री आणि आमचे सरकार हे शेतकऱ्यांना पूर्ण मदत करण्यासाठी ताकद देण्याचे काम करणार आहे. त्यासाठी जे काही करावे लागेल ते करणार आहे. दोन-चार प्रकल्प त्यासाठी मागे पडले तरी चालतील पण शेतकऱ्यांना आम्ही काही कमी पडू देणार नाही. या करता आमचे पूर्ण नियोजन सुरू आहे, असे महसूलमंत्री बावनकुळे यांनी म्हटले आहे.

बावनकुळे म्हणाले की, गवई यांच्यावर झालेला हल्ला ही घटना निषेधार्य आहे. सरकारने या घटनेला गांभीयार्ने घेतले आहे. भुषण गवई यांच्यासारखे प्रतिष्ठा वान व्यक्तीवर भ्याड हल्ला करणे योग्य नाही. शरद पवार यांनी या घटनेवर आंदोलन करावे का नाही हे ठरवायला हवे. हे काही आंदोलन करण्यासारखी गोष्ट नाही, असे गुन्हे पुन्हा होऊ नये यासाठी आपण प्रयत्न केले पाहिजे.

**मविआमुळे ओबीसी आरक्षण रद्द**

मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, महा विकास आघाडी सरकारच्या नाकर्तेपणामुळे ओबीसीचे २७ टक्के आरक्षण रद्द झाले होते. भाजप महा युतीमुळे ते पुन्हा मिळाले. भाजप हाच खरा ओबीसीचा हितचिंतक आहे असा दावा चंद्रशेखर बावनकुळे यांनी केला. राज्यात सर्वत्र पूरपरिस्थिती आहे. अशा परिस्थिती राजकारण सोडून सर्वांनी शेतकऱ्यांच्या मदतीसाठी एकत्र यावे आणि मोर्चा रद्द करावा.

**हा आमचा विजय**

मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, २०१९ मध्ये महा विकास आघाडी सरकारच्या नाकर्तेपणामुळे ओबीसीचे २७ टक्के आरक्षण रद्द झाले होते. त्या विरोधात भाजपच्या आमदारांनी आंदोलन केले होते. त्या वेळी आघाडी सरकारने आमच्याविरुद्ध आकसापोटी गुन्हे दाखल केले होते. न्यायालयाने आज आम्हाला निर्दोष मुक्त केले असून हा न्यायाचा विजय आहे.




■ ***नागपूर :*** *सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधिश भूषण गवई यांच्यावर न्यायालयातच जोडा भिरकावण्याच्या घटनेने देशभरात संतापाची लाट उउसळली आहे. या घटनेचा सर्वच स्तरातून निषेध केला जात आहे. अ‍ॅडव्होकेटस् मल्टीस्टेट मल्टीपर्पज को. ऑप. सोसायटी, मुंबई, शाखा नागपूर तसेच महाराष्ट्र आणि गोवा वकील परिषदेच्या वतिनेही आज नागपूर येथे या घटनेचा तीव्र निषेध नोंदविण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने वकील उपस्थित होते.*

# फुटाळा : गडकरींचा ड्रीम प्रोजेक्ट पूर्ण होणार

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :** नागपूरमधील फुटाळा तलाव आर्द्रभूमी (वेटलँड) म्हणून घोषित करण्यास नकार देणाऱ्या मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी मान्यता दिली. त्यामुळे तलाव परिसरात उभारण्यात येणाऱ्या फ्लोटिंग रेस्टॉरंट, बॅन्क्वेट हॉल, संगीत कारंजे (म्युझिकल फाऊंटन) आणि दृश्य गॅलरी यांसारख्या तात्पुरत्या स्वरूपातील प्रकल्पांना कायदेशीर मान्यता मिळाली आहे.

सरन्यायाधीश भूषण गवई, तसेच न्यायमूर्ती के. विनोद चंद्रन आणि एन. व्ही. अंजारिया यांच्या खंडपीठाने नागपूर मधील स्वयंसेवी संस्था स्वच्छ असोसिएशन यांनी दाखल केलेली याचिका फेटाळून लावली.

या संस्थेने नागपूर खंडपीठात दाखल केलेल्या जनहित याचिकेत असे नमूद केले होते की, तलावाभोवती उभारण्यात येणारी तात्पुरती बांधकामे ही नियमांचे उल्लंघन करतात आणि त्यामुळे तलावाचे पर्यावरणीय संतुलन बिघडू शकते.

याचिकाकर्त्यांनी सार्वजनिक विश्वास तत्त्व आणि पूर्वकाळजीचा सिद्धांत यांचा आधार घेत तलाव परिसरातील मूळ पर्यावरणीय रचना अबाधित ठेवण्याची मागणी केली होती. त्यांच्या मते, फुटाळा तलाव हा नैसर्गिक जलाशय असून तेथे कोणतेही मानवनिर्मित संरचनात्मक काम पर्यावरणासाठी धोकादायक ठरू शकते.

राज्य शासन आणि इतर उत्तरदारांनी या दाव्याला विरोध करत स्पष्ट केले की फुटाळा तलाव हा मानवनिर्मित जलाशय आहे, त्यामुळे तो आर्द्रभूमीच्या परिभाषेत येत नाही. तसेच या प्रकल्पासाठी वर्ष २०१९ व २०२२ मध्ये सर्व आवश्यक परवानग्या, वारसा समितीची मान्यता आणि शहरी विकास विभागाची अनुमती घेण्यात आली आहे.

उच्च न्यायालयाने आपल्या निकालात नमूद केले होते की, तलाव जरी कायदेशीरदृष्ट्या आर्द्रभूमी नसला तरी पर्यावरणीय काळजीच्या तत्त्वांचा अवलंब करणे आवश्यक आहे. न्यायालयाने कायमस्वरूपी बांधकामांना बंदी घालून, केवळ तात्पुरत्या व मंजूर प्रकल्पांना मर्यादित स्वरूपात परवानगी दिली होती.

या निर्णयाविरुद्ध स्वच्छ असोसिएशनने सर्वोच्च न्यायालयात अपील दाखल केले होते. सर्वोच्च न्यायालयाने आता उच्च न्यायालयाचा निर्णय कायम ठेवत असे स्पष्ट केले की फुटाळा तलाव हा आर्द्रभूमीच्या परिभाषेत येत नाही, आणि राज्य शासनाने घेतलेल्या सर्व परवानग्या व पर्यावरणीय अटींच्या अधीन राहून हे प्रकल्प पुढे नेण्यास हरकत नाही.

परिणामी, केंद्रीयमंत्री नितीन गडकरी यांच्या स्वप्नातील या प्रकल्पाचा मार्ग अखेर मोकळा झाला आहे.

# आम्ही काय भांडे धुवायला बसलोय का?

## जरांगेंच्या वक्तव्यावरुन तायवाडेंचा संताप

■ **महासागर प्रतिनिधी**
**नागपूर, दि. ७ :**



मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर पुन्हा एकदा राज्यातील राजकारण तापले आहे. मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्या नेत्यांवर मनोज जरांगे पाटील यांनी दिलेल्या विरोध करणारा संपवायचा या इशाऱ्याने नवा वाद पेटला आहे.

या वक्तव्यावरून राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष बबनराव तायवाडे यांनी जोरदार पलटवार केला आहे. आमच्या मनगटात ताकद नाही का? आम्ही काय भांडे धुवायला बसलोय का? असा सवाल करत तायवाडे यांनी जरांगेंच्या विधानावर थेट हल्ला चढवला आहे.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी गेल्या दोन वर्षांत आक्रमक आंदोलन उभारणारे मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा राज्याच्या राजकारणात खळबळ माजवली आहे. नुकत्याच दिलेल्या वक्तव्यात त्यांनी मराठ्यांवर जळणारे एवढे लोक का आहेत? आपला खरा शत्रू कोण हे कळाले. आता चिंता करायची नाही, विरोध करणारा संपवायचं, असा इशारा दिला. या विधानाने राजकीय आणि सामाजिक वतुर्ळात धुमस निर्माण झाला आहे.
जरांगेंच्या या वक्तव्याचा संदर्भ ओबीसी नेत्यांकडे गेला आणि त्यातून वादाचे नवे पर्व सुरू झाले. ओबीसी समाजात या वक्तव्याविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली जात असून, संपवायचं ही भाषा समाजात द्वेष आणि संघर्ष निर्माण करणारी आहे, अशी टीका होत आहे.

मनोज जरांगेंच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना बबनराव तायवाडे यांनी संतप्त प्रतिक्रिया दिला आहे. जरांगे म्हणतात विरोध करणाऱ्यांचा गेम संपवणार, तर आम्ही काय भांडे धुवायला बसलोय का? आमच्या मनगटातही ताकद आहे, असे त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले. त्यांनी पुढे म्हटले की, आमच्या ओबीसी समाजाला मिळालेले २७ टक्के आरक्षण संविधानाने संरक्षित केलेले आहे. ते कोणी हिरावून घेऊ शकत नाही.

मनोज जरांगे आपल्या लोकांना खुश करण्यासाठी अशा बालिश आणि भडकाऊ वक्तव्यांचा वापर करत आहेत. जरांगे यांनी पुढेही अशी भाषा केली, तर आम्ही प्रत्येक ओबीसी नेता आणि कार्यकर्त्यांच्या पाठिशी उभं राहू. संघर्षाला तयार राहू. आमचे आरक्षण कोणी संपवू शकत नाही. सरकारने जरांगे यांच्यावर तत्काळ गुन्हा दाखल करून कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणीही तायवाडेंनी सरकारकडे केली आहे.

**: मुलखावेगळी माणसं :**

# काष्ठशिल्पकार छगन शिक्कलकर



**लोकरंग**

शिल्पकलेची अनेकांना आवड असते. शिल्पात कोरलेली चित्र कायमच मनमोहित करतात. देवाकडून जन्मजात मिळालेल्या याच नजरेच्या माध्यमातून धुळ्यातील त-हाडी येथील सामान्य कुटुंबाचे छगन जगन्न शिकल्लकर यांनी काष्ठशिल्पाचा छंद चांगल्या पद्धतीनं जोपासलाय. शिकल्लकर यांना शालेय जीवनापासूनच चित्रकलेची आवड होती. निसगार्ने निर्माण केलेल्या सृष्टीत अनमोल खजिना दडलेला आहे. झाडांची मुळं, फांद्या, लाकूड, वेली यात विविध प्रकारच्या कलाकृती दडलेल्या असतात.

शिल्पकलेच्या दगड आणि धातू या दोन माध्यमांप्रमाणेच लाकूड किंवा काष्ठ हेही एक महत्त्वाचे माध्यम आहे. हस्त व्यवसाय आणि इतर उपयुक्त कला इत्यादींत जसा लाकूडकामाचा अंतर्भाव होतो, त्याचप्रमाणे उच्च प्रकारची शिल्पकला म्हणूनही काष्ठशिल्प गणले जाते. जंगलातील अनेक वनस्पती, झाडांपासून विविध आकार असलेली शिल्पे तयार होतात. परंतु ते प्रत्येकाच्या नजरेस पडत नाहीत. कारण त्यास पारखी कलाकाराच्या नजरेची गरज असते.

छगन जगन्न शिकल्लकर यांनीसुद्धा काष्ठशिल्पाची कला जोपासली. घरीच त्यांनी आपली शिल्प कार्यशाळा समजून कामाला सुरुवात केली. जातीने आदिवासी असलेल्या शिकल्लकर यांनी सुतार कामाची सर्व अवजारे आणली आणि लाकडाच्या प्रत्येक तुकड्यापासून एक सुंदर शिल्प आकार घेऊ लागले. मागील २० वर्षांपासून त्यांनी ही कला जोपासली असून, आज अनेक सुंदर शिल्पे त्यांच्याकडे तयार झालीत. लाकडांना आकार देऊन सुंदर काष्ठशिल्प घडविण्याचे काम छगन शिकल्लकर करीत असतात. आपल्या जबाबदारीतून मिळालेल्या फावल्या वेळेत ते आपला छंद जोपासतात. तऱ्हाडी येथील घरामध्ये त्यांनी तयार केलेले अनेक काष्ठशिल्प अडगळीत पडलेले दिसून येतात.

एक शिल्प बनविण्यासाठी त्यांना साधारण ८ दिवस अथवा दोन महिने देखील लागतात. प्रत्येक शिल्पाच्या आकारानुसार ते बनविण्याचा कालावधी अवलंबून असतो. शिल्पासाठी आणलेल्या लाकडाला पटाशी, किकरे, काणस या अवजारांचा वापर करून वेगळा आकार दिला जातो. आवश्यकतेनुसार जोडणी करून तर काही अखंड काष्ठशिल्पाची पॉलिश पेपरने घसाई केली जाते. त्यामुळे ते शिल्प गुळगुळीत होते.

पॉलिशचा लेप दिल्यानंतर ते अधिक आकर्षित होते. एकदा बनविलेल्या शिल्पासारखे सेम टू सेम दुसरे शिल्प तयार होत नाही. प्रत्येक शिल्पाचे वेगळेच महत्त्व असल्याचे शिकल्लकर यांनी सांगितले. या काष्ठशिल्पांसाठी ते शिवन, जांभूळ, साग, बोर, अंजन या जातीच्या लाकडांचा वापर करतात.छगन शिकल्लकर यांच्या संग्रहात बैलगाडी, लाटणे, बाजवड, गवराई, रोटपाटले पाटल, काम शिल्प, आदी आकर्षक काष्ठशिल्पे आहेत. मी छंदातून जोपासलेल्या काष्ठिशल्पांचे जिल्हास्तरावर प्रदर्शन भरवण्याची माझी इच्छा आहे. मात्र आजपर्यंत ही संधी मिळू शकली नाही याची खंत आहे, असंही छगन शिकल्लकर सांगतात.

काष्ठ हे शिल्पाच्या सर्वांत प्राचीन माध्यमांपैकी एक आहे. लाकडातून शिल्पाकृती कोरून काढण्याची परंपरा आजही प्रचलित आहे. शिकल्लकर यांच्या काष्ठकलेतून भारतीय कलेच्या ऐतिहासिक प्रवासाचा बोध होतो, असंही डी. एस. मोरे या कलाशिक्षकानं सांगितलं.

■ ■ ■

## : किड्स इंडिया २०२५ :
# नवकल्पना आणि जागतिक संधींचा उत्सव

भारताचा प्रमुख बी2बी टॉय फेअर किड्स इंडिया 2025 मुंबईतील बॉम्बे एक्झिबिशन सेंटरमध्ये सुरू झाला. हा मेळा स्पिलवारनमेसे इंडिया प्रा. लि. यांनी आयोजित केला असून, ती जर्मनीतील स्पिलवारनमेसे या जगातील सर्वात मोठ्या टॉय फेअर आयोजक संस्थेची सहयोगी कंपनी आहे.



या कार्यक्रमात नामांकित उत्पादक, वितरक, किरकोळ विक्रेते आणि उद्योगातील तज्ज्ञ सहभागी होत असून, खेळण्यांच्या जगातील नव्या प्रवृत्ती, नवकल्पना आणि व्यवसाय संधी यांचे प्रदर्शन करण्यात येत आहे. स्पोर्ट्स गुड्स एक्सपोर्ट प्रमोशन कौन्सिल ऑल इंडिया टॉय मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन आणि सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय यांच्या सहयोगाने आयोजित हा मेळा नेटवर्किंग, ज्ञानविनिमय आणि जागतिक बाजारपेठेतील संधींसाठी एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ म्हणून ओळखला जातो. होस्टेड बायर प्रोग्रामला देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय खरेदीदारांचा मोठा प्रतिसाद मिळत असून, हा मेळा व्यवसायासाठी एक प्रीमियम केंद्र बनला आहे, असे तनु ऐलावाडी, व्यवस्थापकीय संचालक, स्पिलवारनमेसे इंडिया प्रा. लि. यांनी सांगितले.

या फेअरमध्ये अनेक नवीन उत्पादने सादर केली जात आहेत. त्यातील एक आकर्षण म्हणजे क्रिकेट आयकॉन्स या ब्रँडकडून सादर करण्यात आलेल्या 7-इंची ॲक्शन फिगर्स क्रिकेटप्रेमी आणि कलेक्टर्ससाठी एक नवीन अनुभव देणारी प्रीमियम शृंखला. क्रिकेट आयकॉन्स यांनी आपल्या या नव्या मालिकेचे लॉंचिंग किड्स इंडियामध्येच करण्याचा निर्णय घेतला, ज्यातून या फेअरचे नवकल्पनांसाठीचे केंद्रस्थान अधोरेखित होते.


2025 चा परिषद कार्यक्रम खेळण्यांच्या उद्योगातील बदलत्या गरजांवर आणि भविष्यातील दिशांवर केंद्रित आहे. यामध्ये भारतात टॉय सेफ्टी इकोसिस्टम विकसित करण्यावरील चर्चा, स्मार्ट टॉइज, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल तंत्रज्ञानाचा खेळण्यांवरील प्रभाव, तसेच टॉइज विथआऊट बॅरियर्स सर्वसमावेशक आणि लिंग - निरपेक्ष खेळण्यांवरील सत्राचा समावेश आहे.

फ्रॉम इम्पोर्टर टू एक्सपोर्टरः इंडियास रायझिंग ग्लोबल फुटप्रिंट इन द टॉय इंडस्ट्रीर या सत्रात भारताच्या खेळणी उत्पादन आणि निर्यात क्षेत्रातील वाढीवर प्रकाश टाकण्यात आला.उद्घाटन समारंभात उद्योगातील प्रतिष्ठित नेत्यांनी भारताच्या खेळणी उद्योगातील बदलत्या वातावरणावर आपले विचार मांडले. महाराष्ट्र शासनाचे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री आशीष शेलार म्हणाले, आपण अशा खेळणी ब्रँड्स निर्माण करूया जे भारताच्या आत्म्याशी जोडलेले आहेत जिथे नवकल्पना आणि परंपरा यांचा संगम आहे, आणि प्रत्येक मुलाचे खेळ आपल्या संस्कृती, मूल्ये आणि आत्मनिर्भर भारत व वसुधैव कुटुंबकम् या दृष्टीकोनाशी जोडलेले आहे. भारतातील खेळणी निर्मितीची परंपरा आपल्या कौशल्य आणि विविधतेचे दर्शन घडवते.

■ ■ ■

# असा लागला शोध भुर्रर उडणारे विमान

विमान शोधाबद्दल दोन प्रमुख मते आहेतः एक, भारतीय शिवकर बापूजी तळपदे यांनी १८९५ मध्ये प्राचीन ग्रंथांवर आधारित विमानाचा शोध लावला आणि उड्डाण केले, जे जगाला कमी माहिती आहे.



दुसरी, राईट बंधूंनी १७ डिसेंबर १९०३ रोजी पहिले यशस्वी, शक्तीवर चालणारे विमान तयार करून उड्डाण केले, ज्यांना या शोधाचे श्रेय दिले जाते.

शिवकर बापूजी तळपदे यांनी १८९५ मध्ये भारतात विमानाचा शोध लावला, असा एक दावा आहे, त्यांनी महर्षी भरद्वाज यांच्या प्राचीन ग्रंथांचा अभ्यास करून, एका विमानाचे यशस्वी उड्डाण १५०० फूट उंचीपर्यंत केले होते, असे मानले जाते.

परंतु, या शोधाचे श्रेय राईट बंधूंना दिले जाते, त्यामुळे याबद्दल वाद आहेत. ऑरव्हिल आणि विल्बर राईट यांनी १७ डिसेंबर १९०३ रोजी पहिले यशस्वी, शक्तीवर चालणारे विमान तयार केले आणि उड्डाण केले. त्यांनी पक्ष्यांचा अभ्यास करून आणि विविध ग्लायडरच्या चाचण्या घेऊन उड्डाणाबद्दल शिकले.त्यांच्या पहिल्या विमानात, ज्याला 'फ्लायर' म्हणतात, सतत उड्डाण करण्यासाठी मोटर होती.

थोडक्यात, विमान शोधण्याच्या इतिहासावर अनेक मते आहेत आणि या विषयावर वादंग आहेत. भारतात शिवकर बापूजी तळपदे यांचाही शोध मानला जातो, तर जगात राईट बंधूंना विमानाचे जनक मानले जाते. ■ ■ ■

**: संकलन व संयोजन :**
**सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६**
subodh.ranshevre @rediffmail.com

# 'राज' सोबतीला काँग्रेसचा विरोध

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ७ :**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला आघाडीत सामावून घेण्यास काँग्रेसने ठाम विरोध दर्शवला आहे. महाविकास आघाडीला आणि काँग्रेसला नव्या भिडूची आवश्यकता नाही, असे विधान काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केले असून, यामुळे ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या युतीच्या चर्चेला धक्का बसला आहे. दरम्यान, आम्ही युतीसाठी तुमच्याकडे कुठे आलोय, असे प्रत्युत्तर मनसेने दिले आहे.

इंडिया आघाडीच्या वाटाघाटी काँग्रेसच्या स्थानिक पातळीवर होणार आहेत. जिल्हा आणि ब्लॉक पातळीवरील अध्यक्ष, शहराध्यक्ष आणि कार्यकर्त्यांच्या सल्ल्यानुसार निर्णय घेतले जातील. त्यामुळे नवीन मित्रपक्ष घेण्याची आवश्यकता नाही, असे हर्षवर्धन सपकाळ म्हणाले. तसेच विद्यमान महाविकास आघाडी पुरेशी मजबूत आहे. त्यामुळे नवीन भिडूची आवश्यकता काँग्रेस आणि महाविकास आघाडीला नाही, असे सपकाळ म्हणाले.

सपकाळ यांच्या विधानाला मनसेकडूनही प्रत्युत्तर देण्यात आले आहे. युतीसाठी आम्ही कुणाकडे गेलो नाही. आमच्याकडे आले असतील, तर त्यांना विचारावे. आमच्या पक्षात निर्णय घेण्याचे अधिकार फक्त राज ठाकरे यांनाच आहे, असे मनसे नेते अविनाश अभ्यंकर यांनी सांगितले. यामुळे मनसे आणि मविआ यांच्या आघाडीबाबत संभ्रम आहे.

# अवजड वाहनांना शहरात प्रवेशबंदी



■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ७ :** शेजारील परराज्ये आणि अन्य मार्गाने शहरात येणारी जड वाहतूक अपघाताला कारण ठरत असल्याने वाहतूक शाखेने अवजड वाहनांना प्रवेश बंदी लागू केली आहे. विभागाचे उपायुक्त लोहित मतानी यांनी तडकाफडकी याबाबतचे परिपत्रक जारी केले.

यात जिल्ह्याच्या बाहेरून शहरात येणारी वाहतूक बाह्यवळण रस्ता मार्गे परस्पर शहराबाहेरून प्रवास करतील. शहरात दूध, जीवनावश्यक वस्तू, इंधन आणि ऑक्सिजन पुरवठा करणाऱ्या वाहनांव्यतिरिक्त जड वाहतुकीलाही पायबंद घातला जाणार आहे.

नागपूर मार्गे जिल्ह्या बाहेर जाणाऱ्या वाहनांना बाह्य वळण रस्त्याचा वापर करावा लागणार आहे. बरेचदा बाह्यवळण रस्ता टाळून ट्रक चालक शहरातील अंतर्गत मार्गांवरून प्रवास करतात. त्यामुळे अपघातांची संख्या वाढत आहे. गेल्या पाच वर्षांत शहरात ४२२ अपघात झाले. यात ४५७ लोकांचा मृत्यू झाला तर २७९ गंभीर अपघातात ५६३ जण गंभीर जखमी झाले. यातील अनेकांना कायमचे अपगंत्व आले.

या कालावधीत १८० अपघातात २४७ जण लोक किरकोळ जखमी झाले. त्यामुळे, या वाहतुकीला शहरात प्रवेश बंदी लागू होणार आहे. वाहतूक शाखेने जारी परिपत्रकात विविध मार्गांनी शहराच्या दिशेने होणारी जड वाहतूक बाह्य वळण रस्त्याच्या कुठल्या मार्गाने वळवावीत याबाबत स्पष्ट आदेश आहेत.

शहरातील औद्योगिक क्षेत्रातून जड वाहतूक होणार आहे. मात्र, या वाहतुकीलाही वेळेचे बंधन घालण्यात आले आहे. जबलपूर व भंडाराकडून एमआयडीसीकडे येणारी जड वाहने कापसी उड्डाणपूल, जामठा , झिरो सर्कल अमरावती मार्गावरील गोंडखैरी टि-पॉइंन्ट येथून उजवे वळण घेवून सरळ वाडी टि-पॉइंन्ट मार्गाचा वापर करतील. जीवनावश्यक वस्तुंची वाहतूक करणाऱ्या वाहनांना शहर हद्दीत प्रवेशासाठी सकाळी ६ ते दुपारी १२ आणि दुपारी ४ ते रात्री १० पर्यंत वाहतूकीस मनाई असेल. अजनीतील भारतीय खाद्य निगम गोदाम, संत्रा मार्केट तसेच शासकीय गोदाम येथे होणारी जड वाहतुकीचे मार्ग निश्चित करण्यात आले आहेत.

शासकीय कामात गुंतलेल्या जड वाहन चालकांनी मुळ प्रमाणपत्र बाळगणे सक्तिचे असेल. वाहनावर सरकारी कर्तव्याचे फलक सक्तीची असेल.य दुध, इंधनासारख्या जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा करणारी जडवाहने बाह्यवळण मागार्चाच अवलंब कतील. जडवाहनाचे मालक- चाकांना वाहतूक नियम पालन सक्तिचे असेल. शहराच्या हद्दीतून ताशी ३० कि.मी. गतीची मर्यादा बंधनकारक असणार आहे.

नागपूर शहरात माल वाहतूक करणाऱ्या जड वाहन धारकांनी दुपारी १२ ते ४ दरम्यान शहरात प्रवेश मिळावा, अशी मागणी केली आहे. शहरात मधल्या मागार्ने अनेक वाहने दाखल होतात. या बाबींचा विचारकरून प्रशासनाकडून शहरात विकासकामाचे पुरावे देणाऱ्या वाहनाला परवानगी दिली जाईल. मात्र, दुपारी १२ ते ४ आणि रात्री १० ते सकाळी ६ वाजतापर्यंत याव्यतिरीक्त कोणतेही जड वाहन दिसल्यास वाहन जप्तीची कारवाई केली जाणार आहे.

# तिसऱ्या व चौथ्या रेल्वे मार्गाला अखेर मंजुरी

## मुंबई-हावडा मार्गावरील ताण कमी होणार : अतिरिक्त गाड्यांचे संचालन शक्य

■ **महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. ७ :**

महाराष्ट्रातील रेल्वे नेटवर्क आणखी सक्षम करण्याच्या दिशेने मोठे पाऊल टाकण्यात आले आहे. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचर सातत्याने विकासाला दिशा देण्याचे काम असल्याच्या कृतीने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव व रेल्वे बोर्डाने भुसावळ - वर्धा तिसरी आणि चौथी रेल्वे मार्ग प्रकल्पाला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी मिळाली आहे.



या प्रकल्पामुळे मुंबई - हावडा या देशातील महत्त्वाच्या रेल्वे मार्गावरील वाहतुकीवरील ताण कमी होणार असून, अतिरिक्त प्रवासी गाड्यांचे संचालनही शक्य होणार आहे. व नवीन गाड्या सुरू होण्यास व सुविधा मिळण्यास गती मिळेल. दळणवळण सुविधेत वाढ होईल. या प्रकल्पाची लांबी ३१४ किलोमीटर असून, यावर अंदाजे ९१९७ कोटींचा खर्च होणार आहे. या मार्गावर ७२ रोड ओव्हर/अंडर ब्रिज आणि १ रेल ओव्हर रेल ब्रिज बांधण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे जळगाव, बुलढाणा, अकोला, अमरावती आणि वर्धा यवतमाळ हिंगोलीहे जिल्हे लाभान्वित होणार आहेत. रेल्वे मार्गावरील वाढत्या वाहतुकीमुळे निर्माण होणारा अडथळा कमी होऊन गाड्यांच्या वेळापत्रकात सुधारणा होईल. तसेच पर्यटन आणि रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होतील.

याशिवाय या प्रकल्पामुळे ४५ कोटी किलो सीओ २ उत्सर्जनात घट होणार असून, ही घट १.८ कोटी झाडे लावल्यासारखीच परिणामकारक ठरेल.

या संदर्भात खासदार अनुप धोत्रे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे आभार मानले आहेत . सहकारी आमदार रणधीर सावरकर, आमदार हरीश पिंपळे, आमदार प्रकाश भारसाकळे, आमदार वसंत खंडेलवाल यांनी विकास कामाला सहकार्य केल्याबद्दल आभार व्यक्त केले आहेत.